रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १५४
www.ramprahar.com
◆ रविवार, २१ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

स्कूल व्हॅन, रिक्षाला डंपरची धडक, दोन विद्यार्थी जखमी/२
रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४
पनवेलमध्ये आज एक धाव मतदानासाठी!/८

## 'आसामला पूर्व पाकिस्तानचा भाग बनवण्याचा कट होता'



**गुवाहाटी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आसाममधील गुवाहाटी येथे एका जाहीर सभेला संबोधित करताना काँग्रेसवर अत्यंत तिखट शब्दांत हल्ला चढवला. काँग्रेस सरकारच्या काळात आसाम आणि ईशान्य भारताचा विकास त्यांच्या अजेंड्यातच नव्हता, उलट आसामला 'पूर्व पाकिस्तान'चा भाग बनवण्याचे कट कारस्थान रचले जात होते, असा खळबळजनक आरोप पंतप्रधान मोदी यांनी केला आहे. ते म्हणाले, काँग्रेसच्या सरकारांमध्ये बसलेले लोक विचारायचे, आसाम आणि ईशान्येकडे जातंच कोण? आसाममध्ये आधुनिक विमानतळ, रेल्वे आणि हायवेची काय गरज आहे? असा विचार ते करायचे. याच संकुचित विचारामुळे काँग्रेसने अनेक दशके या संपूर्ण प्रदेशाची उपेक्षा केली. काँग्रेसने सहा-सात दशकांत केलेल्या चुका आता आपले सरकार एक-एक करून सुधारत आहे.

# अखेर 'मविआ'ला तडा!

## काँग्रेस मुंबई महापालिका स्वबळावर लढणार

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. ठाकरे बंधूंची युती झाल्यानंतर 'मविआ'चे भविष्य काय? असा प्रश्न उपस्थित झाला असताना अखेर काँग्रेसने ही निवडणूक स्वबळावर लढण्याची घोषणा शनिवारी (दि. २०) केली.



मुंबई काँग्रेस संसदीय कार्य समितीची बैठक पक्षाचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या उपस्थितीत झाली. बैठकीला मुंबई काँग्रेस अध्यक्ष व खासदार वर्षा गायकवाड, सहप्रभारी यु.बी. व्यंकटेश, खासदार चंद्रकात हांडोरे, काँग्रेस कार्य समितीचे सदस्य नसीम खान, आमदार अस्लम शेख, अमिन पटेल, ज्योती गायकवाड, सचिन सावंत आदी उपस्थित होते. बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना प्रभारी चेन्नीथला यांनी, आम्ही मुंबई महापालिका स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्याचे जाहीर केले.

प्रभारी चेन्नीथला पुढे म्हणाले की, मागच्या काळात मुंबई महानगरपालिकेत काय झाले याची जनतेला कल्पना आहे. मुंबईत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून हवा तसा विकास झालेला आहे. त्यामुळे आम्ही स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला. धर्मनिरपेक्ष पक्षांनी आमच्याबरोबर यावे.

काँग्रेसने स्वबळाचा नारा दिल्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला धक्का बसला आहे. 'उबाठा'ने जवळीक साधलेल्या मनसेच्या परप्रांतियांबद्दलच्या भूमिकेबाबत काँग्रेसला आक्षेप आहे.

### आधीपासून तयारी

स्वबळाची घोषणा करण्यापूर्वीच काँग्रेसने आपला इरादा स्पष्ट केला होता. मागच्या दोन दिवसांपासून निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती सुरू होत्या. ९५० इच्छुकांनी आपले अर्ज पक्ष कार्यालयाकडे सादर केले. सर्व मुलाखती घेऊन त्याचा अहवाल वरिष्ठांना सादर करण्यात आला.

# माजी आमदार सुभाष भोईर भाजपमध्ये; 'उबाठा'ला धक्का

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार सुभाष भोईर यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह शनिवारी (दि.२०) भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत 'कमळ' हाती घेतले. या प्रवेशाच्या निमित्ताने भाजपने ठाणे महापालिका निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे गटाला मोठा धक्का दिला आहे.

मुंबईत झालेल्या भोईर व समर्थकांच्या पक्षप्रवेश कार्यक्रमास आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, भाजप ठाणे शहराध्यक्ष संदीप लेले यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



सुभाष भोईर हे ठाणे महापालिकेचे पाच वेळा नगरसेवक राहिले आहेत. २०१४मध्ये कल्याण ग्रामीण मतदारसंघाचे आमदारही होते. त्यामुळे ठाणे आणि कल्याण महापालिकांच्या क्षेत्रात त्यांनी यापूर्वी प्रतिनिधीत्व केले आहे. त्यांना सामाजिक प्रश्नांची जाण असून त्यांच्या पक्षप्रवेशाने ठाणे जिल्ह्यात भाजप संघटना आणखी मजबूत होईल.

विकासपुरुष पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यशैलीने प्रेरित होऊन भाजप परिवारात प्रवेश केल्याचे या वेळी बोलताना माजी आमदार सुभाष भोईर यांनी सांगितले तसेच भाजपच्या विचारधारेतूनच आपली राजकीय कारकीर्द सुरू झाल्याचेही त्यांनी नमूद केले.

## पुण्यातील माजी नगरसेवकांचाही पक्षप्रवेश

पुणे येथील माजी नगरसेवकांसह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले.





पक्षप्रवेश कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील, माजी आमदार संग्राम थोपटे, भाजपचे पुणे जिल्हाध्यक्ष धीरज घाटे, माजी सभागृह नेते गणेश बिडकर आदी उपस्थित होते.

या वेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार बापूसाहेब पठारे यांचे पुत्र सुरेंद्र पठारे, दिवंगत माजी आमदार रमेश वांजळे यांच्या कन्या सायली वांजळे, माजी नगरसेवक सचिन दोडके, बाळासाहेब धनकवडे, विकास दांगट, नारायण गलांडे, रोहिणी चिमटे, काँग्रेस नेते व माजी मंत्री वसंतराव चव्हाण यांचे पुत्र कणव चव्हाण, हडपसर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसच्या वैशाली तुपे, विराज तुपे, खंडू लोंढे, पायल तुपे, प्रतिभा चोरगे, शुभांगी होले, राजेंद्र लोखंडे, बाबा शिवरकर, विद्यानंद बोंद्रे, इंदिरा तुपे, मुळशी तालुक्यातील उबाठा गटाचे कार्यकर्ते व पंचायत समिती माजी सभापती भानूदास पानसरे, उपतालुकाप्रमुख गणेश पानसरे, कृष्णकुमार पानसरे, श.प. गटाचे तालुकाध्यक्ष आनंद माझिरे, उपाध्यक्ष संतोष पानसरे, सरचिटणीस सुहास पानसरे, उपाध्यक्ष किरण मराठे आदींनी भाजपमध्ये प्रवेश केला.

दरम्यान, पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संजोग वाघेरे-पाटील यांच्यासह माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्तेही भाजपत दाखल झाले.

# नगरपालिका निवडणुकीचा आज निकाल

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यातील २३ नगर परिषदा आणि नगरपंचायतींसाठी शनिवारी (दि. २०) मतदान झाले. आताच्या आणि पहिल्या टप्प्यात मतदान झालेल्या नगरपालिकांच्या निवडणुकीचा निकाल रविवारी (दि. २१) जाहीर केला जाणार आहे. सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणी सुरू होईल.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, मुरूड जंजिरा, रोहा अष्टमी, श्रीवर्धन, महाड, उरण, खोपोली, कर्जत, माथेरान या नगर परिषदांच्या नगराध्यक्षपदासाठी ३४, तर नगरसेवकपदासाठीच्या २०९ जागांकरिता ५७५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्यांच्या राजकीय भवितव्याचा फैसला रविवारी होणार आहे.

रायगड जिल्ह्यात १०७ प्रभागातून २१७ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. त्यापैकी पेण नगर परिषदेत सहा, तर अलिबाग आणि रोह्यामध्ये प्रत्येकी एक असे एकूण आठ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे नगरसेवकपदाच्या २०९ जागांसाठी प्रत्यक्ष मतदान घेण्यात आले. न्यायालयीन प्रक्रियेमुळे पहिल्या टप्प्यातील मतमोजणी पुढे ढकलण्यात आली होती. आता दोन्ही टप्प्यातील निकाल रविवारी जाहीर होणार आहे.

## दोन नक्षलींना अटक

**गडचिरोली :** येथील दिनेश गावडे खूनप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेने सीपीआय माओवादी या बंदी असलेल्या संघटनेच्या दोन नक्षलवाद्यांना अटक केली आहे. पोलिसांचा खबरी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सदस्य असल्याच्या संशयावरून गावडे यांचा दोन वर्षांपूर्वी खून झाला होता. या प्रकरणी एनआयएने आणखी चार जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## ज्येष्ठ काँग्रेस नेत्या, माजी मंत्री शालिनीताई पाटील यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ काँग्रेस नेत्या आणि माजी मंत्री शालिनीताई पाटील यांचे शनिवारी (दि. २०) मुंबईतील घरी निधन झाले आहे. त्या माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या पत्नी होत्या.



९४ वर्षीय शालिनीताई काही दिवसांपासून आजारी होत्या. मुंबईतील माहीम येथील घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. साताऱ्याच्या कोरेगाव तालुक्यातील मूळ गावी त्यांच्यावर रविवारी अंत्यसंस्कार होतील.

सांगली जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्ष म्हणून त्यांनी राजकीय कारकीर्दीस सुरुवात केली. खासदार व आमदार म्हणून कामगिरी बजावली. राज्याच्या महसूलमंत्री म्हणूनही त्यांनी काम पाहिले. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.

# 'उबाठा'चे कळंबोली उपशहरप्रमुख संजय भालेरावांसह रहिवासी भाजपमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्याच धर्तीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कळंबोली उपशहरप्रमुख संजय भालेराव यांच्यासह लोटस सोसायटीमधील रहिवाशांनी शुक्रवारी (दि. १९) भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्व प्रवेशकर्त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षात स्वागत केले.





भाजपच्या पनवेल तालुका आणि शहर मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमाला उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक बबन मुकादम, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, खारघर शहर सरचिटणीस दीपक शिंदे, विद्या फरांदे, अंकिता मुकादम, मेघा मुकादम, रत्नमाला शिंदे, मनिषा तिवारी, अतुल वाघमारे, मयूर वालके, गणेश रणदिवे, अभिषेक दळवी, दिलीप खारके यांच्यासह अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

लोटस हे केवळ एका सोसायटीचे नाव नसून प्रगतीचे चिन्ह आहे. ज्याप्रमाणे भाजपने विकासाचे काम केले आहे, त्याचप्रमाणे लोटस सोसायटीच्या आणि पर्यायाने कळंबोलीच्या सर्वांगीण विकासासाठी भाजप सदैव तत्पर राहील. प्रगतीच्या दिशेने जे काही आवश्यक आहे, ते सर्व सहकार्य पक्षाच्या वतीने दिले जाईल, अशी ग्वाही आपल्या मार्गदर्शनपर संबोधनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली तसेच माजी नगरसेवक बबन मुकादम यांच्या कार्याचे कौतुक केले.

या वेळी शिवसेना उबाठा पक्षाचे कळंबोली उपशहर प्रमुख संजय भालेराव, प्रकाश किरवे, भूषण मोरे, बजरंग सावंत, पंकज कदम, अजय नेवसे, वसंत पाटील, सोनाली मोरे, संध्या पाटील, सुचिता नेमाणे, सुनिता चौहान, संगीता पाग, स्नेहल नामदास, दर्शना एडगे, कल्पना एडगे, सोनी पटकोरे, प्रतिभा पाटील, सुगंधा पाटील, पल्लवी खानोलकर, राजश्री नाईक, सुमती राऊत, वैशाली गायकवाड, मनिषा सावंत यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला.

# टी-२० वर्ल्डकपसाठी टीम इंडियाची घोषणा

## गिल आऊट; इशान, रिंकूचे कमबॅक

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत-श्रीलंका यांच्या यजमानपदाखाली होणाऱ्या आयसीसी पुरुष टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेसाठी टीम इंडियाची घोषणा शनिवारी (दि. २०) भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने केली. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील १५ सदस्यीस संघ निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर व कर्णधाराच्या उपस्थितीत बीसीसीयचे संयुक्त सचिव देवजीत सैकिया यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केला.



टी-२० विश्वचषकासाठी शुबमन गिलला संघात स्थान देण्यात आलेले नाही. यष्टीरक्षक-फलंदाज इशान किशन आणि रिंकू सिंग संघात परतले आहेत. टीम इंडियाचा कसोटी आणि वनडेमधील सलामीवीर यशस्वी जैस्वाल यालाही संघात स्थान मिळालेले नाही.

गिलच्या जागी अक्षर पटेलला टी-२० संघाचा उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. अक्षरने यापूर्वी टी-२०मध्ये उपकर्णधार म्हणून काम पाहिले आहे, तर इशानच्या समावेशामुळे जितेश शर्माला संघातून वगळण्यात आले आहे.

टी-२० वर्ल्डकप स्पर्धा ७ फेब्रुवारी ते ८ मार्च या कालावधीत भारत आणि श्रीलंकेतील मैदानांवर रंगणार आहे. भारतीय संघाचा विश्वचषक मोहिमेचा श्रीगणेशा ७ फेब्रुवारीला मुंबईत अमेरिकेविरुद्धच्या सामन्याने होईल, तर अंतिम सामना २० मार्च रोजी खेळवला जाणार आहे.

✻ संघ : सूर्यकुमार यादव (कर्णधार), अक्षर पटेल (उपकर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), हार्दिक पांड्या, शिवम दुबे, कुलदीप यादव, वॉशिंग्टन सुंदर, हर्षित राणा, वरुण चक्रवर्ती, जसप्रीत बुमराह, इशान किशन, रिंकू सिंग, अर्शदीप सिंग.

### भारत-पाकिस्तान महामुकाबला रंगणार

गतविजेत्या भारतीय संघाला या स्पर्धेसाठी गट-अ मध्ये स्थान देण्यात आले आहे. या गटात अमेरिका (यूएसए), नामिबिया, नेदरलँड्स आणि पाकिस्तान हे संघही समाविष्ट आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना १५ फेब्रुवारी रोजी श्रीलंकेतील कोलंबो येथे होणार आहे. टीम इंडियाचा पाकिस्तानविरुद्धचा अलीकडील रेकॉर्ड अत्यंत दमदार राहिला आहे.



# नगरपालिका निवडणुकीत कौल कुणाला? आज निकाल

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ मतमोजणीसाठी प्रशासनान सज्ज झाले असुन तहसील कार्यालयासमोरील दरबार हॉल येथे रविवारी २१ डिसेंबरला सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणीला प्रारंभ होणार आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार–आदेश डफल यांनी दिली आहे. तसेच मतमोजणी कक्षात येणाऱ्या उमेदवारांनी व उमेदवाराच्या प्रतिनिधीनी मोबाईल आणु नये, असे आवाहन ही निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केले.

मुरूड जंजिरा नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता निवडणुक २ डिसेंबर २०२५ या दिवशी सकाळी ७.३० ते ५.३० वाजताच्यादरम्यान १७ मतदान केंद्रांवर झाली. यामध्ये पुरुष ४०२६ महिला ४५०४ या मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला असुन ७३.८९ टक्के मतदानाची नोंद झाली होती. तद्नंतर मतदान यंत्रे उमेदवारांच्या उपस्थित तहसीलदार कार्यालयातील स्ट्राँग रुममध्ये सील बंद करण्यात आले होते. याठिकाणी सीसीटीव्ही कॅमेराची नजर व चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. १९ दिवसांनी स्ट्राँग रुममधुन मतदान यंत्र उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधी समोर बाहेर काढून तहसीलदार कार्यालया समोरील दरबार हॉल येथे आणुन सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणीला सुरवात करण्यात येणार आहे.

मुरूड नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विरुद्ध शिंदे शिवसेना गटामध्ये सरळ लढत होणार आहे. दोन्ही पक्षांनी विजयाचा दावा केला आहे. मतमोजणी नंतर मुरुड नगर परिषद कोणाच्या ताब्यात जाणार हे निश्चित होणार आहे.



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर रोजी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली होती. या निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजल्यापासून अधीक्षक कार्यालयात सुरू होणार आहे.

या निवडणुकीत शिवसेना–भाजप महायुती आणि राष्ट्रवादी काँग्रेस आणि उबाठा गटाच्या शिवराष्ट्र पॅनलमध्ये दुरंगी लढत झाली आहे. थेट नगराध्यक्ष पदासाठी महायुती कडून चंद्रकांत चौधरी तर शिवराष्ट्र पॅनल कडून माजी नगराध्यक्ष अजय सावंत हे उमेदवार होते. काही प्रभागात अपक्ष उमेदवारांनी सदस्य पदासाठी आपले नशीब अजमावण्यासाठी प्रयत्न केले आहेत. सर्व पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आपले उमेदवार निवडून येण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली आहे. त्यामुळे २१ रोजी सकाळी दहा वाजल्यापासून अधीक्षक कार्यालयात निकाल जाहीर होणार आहेत. तसेच सर्वच कार्यकर्त्यांना कार्यालयाबाहेर विविध ठिकाणी नियोजित केल्याप्रमाणे उभे राहण्यासाठी जागा निश्चित केल्या असून कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. जवळपास चाळीस पोलिस यावेळी उपस्थित राहणार आहेत. एकूण दहा प्रभागात वीस उमेदवार सदस्य पदासाठी आणि थेट नगराध्यक्ष पदासाठी एक तसेच सहा अपक्ष उमेदवार असे निवडणुकीमध्ये दोन्ही गटाचे उमेदवार आपले नशीब आजमावणार आहेत.

दरम्यान, आपल्याच पक्षाची सत्ता स्थापन होणार असून नगराध्यक्ष आमचाच होणार याबाबत कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू असून अनेक दिवसांपासून मतांची आकडेवारी करण्यात उमेदवारांसह कार्यकर्ते मग्न दिसत होते. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या निवडणुकीत माथेरान वर वर्चस्व कुणाचे आणि सत्तेत सहभागी कोण होणार याबाबत मतदारांनी कुणाच्या बाजूने कौल दिला आहे हे आज रविवार दि.२१ रोजी स्पष्ट होणार आहे.



**कर्जत : येथे मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा रूट मार्च झाला. पोलीस यंत्रणा सज्ज आहे हे त्यांनी दाखवून दिले.**

## करंजखोल गावात चोरी

**महाड : प्रतिनिधी**

करंजखोल गावामध्ये दुकानाचे गाळे फोडून गाळ्यातील सामान लंपास करण्याची घटना घडली आहे. याबाबत महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महाड शहराजवळील करंजखोल गावामध्ये प्रणित मारुती पाटील यांनी भाड्याने घेतलेल्या दोन दुकानांच्या गाळ्यांचे शटरचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी फ्रिजसाठी लागणारी भांडी, फ्रिज, ॲल्युमिनियमची भांडी अशा इतर जवळपास ८६ हजार किमतीच्या वस्तू लंपास केले आहेत.

याबाबत महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये प्रणित मारुती पाटील यांनी तक्रार दाखल केली असून अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत अधिक तपास पोलीस हवालदार भोईर हे करत आहेत.

## कर्जत तालुक्यात झटपट बोलू इंग्रजीत उपक्रम यशस्वी

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील खाड्याचापाडा या रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक हे बालभारती अभ्यास मंडळाचे सदस्य आहेत. इंग्रजी विषयाचे तज्ज्ञ म्हणून अभ्यास मंडळावर नियुक्त असलेले शिक्षक संतोष नाटीकर यांनी इंग्रजी नवोपक्रममधील एका वेगळ्या बदलाचा व्हिडीओ सोशल मिडीयावर शेअर केला. दरम्यान उपक्रमशील शिक्षक संतोष नाटीकर यांच्या या व्हिडीओला राज्यभरातील शिक्षक यांच्याकडून प्रचंड प्रतिसाद लाभला आहे.



बालभारती अभ्यासमंडळ सदस्य संतोष नाटीकर हे जिल्हा परिषद शाळा खाड्याचापाडा येथील उपक्रमशील शिक्षक म्हणून काम पाहतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी संभाषण कौशल्याचे महत्त्व असाधारण आहे. इंग्रजी भाषा बोलण्यासंबंधी एक रामबाण उपक्रम म्हणजे 'झटपट बोलूया इंग्रजीत' असा हा उपक्रम आहे. कर्जत तालुक्यातील खाड्याचापाडा येथील शाळेवर कार्यरत शिक्षक संतोष नाटीकर यांचा हा उपक्रम सध्या कर्जत तालुक्यातील अनेक अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे आकर्षण बनला आहे. मुलांनी आकलनपूर्वक अस्खलित इंग्रजी बोलावे यासाठी २०–६० दिवसाचा हा उपक्रम अनेक शाळांमध्ये यशस्वी ठरलेला दिसतो आहे.

## रेस्ट एरियाची इमारत धूळखात

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्गावर अद्याप अनेक कामे अपूर्ण अवस्थेत आहेत. यामुळे वाहन चालकांचे हाल होत असतानाच योग्य नियोजन न केल्यामुळे गांधार पाले लेण्याजवळ असलेला रेस्ट एरिया मद्यपींचा अड्डा बनला आहे. या मद्यपींकडून इमारतीचेदेखील नुकसान केले आहे. याबाबत महामार्ग बांधकाम विभागाने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

मुंबई–गोवा महामार्गावर अनेक ठिकाणी वाहनचालकांना तसेच प्रवाशांना विश्रांती घेता यावी यासाठी रेस्ट एरिया तयार करण्यात आलेला आहे. या ठिकाणी बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये स्वच्छतागृह, शौचालय, स्नानगृह, फूड स्टॉल इत्यादी सुविधा आहेत, मात्र सद्यस्थितीत या सुविधा असलेल्या इमारती धुळ खात पडून आहे. महाडजवळ गांधार पाले लेण्याजवळ अशाच प्रकारचा रेस्ट एरिया तयार केलेला आहे, मात्र हा रेस्ट एरिया सर्व्हिस रोड वर तयार करण्यात आला आहे. तर समोर उड्डाणपूल तयार केला असल्याने वाहने किंवा पर्यटक थेट पुढे निघून जात आहेत. यामुळे नियोजना अभावी ही इमारत तशीच पडून असून सध्या मद्यपींनी आपला अड्डा बनवला आहे.

इमारतीमध्ये भारतीय पुरातत्व विभाग आणि महामार्ग पोलीस पथकाचे कार्यालय सुरू व्हावे यासाठी त्यांनादेखील प्रस्ताव दिल्याचे महामार्ग विभागाकडून सांगण्यात आले, मात्र या दोन्ही विभागांनी या ठिकाणी आपले कार्यालय सुरू केलेले नाही त्यामुळे अद्याप इमारत अशाच अवस्थेत असल्याचे महामार्ग विभागाकडून सांगण्यात आले. एक महामार्गाच्या एकूण कामामधीलच हा भाग असून महाड सह पुढेदेखील अनेक ठिकाणी अशा प्रकारचे रेस्ट एरिया आणि इमारत बांधण्यात आलेल्या आहेत.

मुंबई–गोवा महामार्गाचे काम करताना गांधार पाले लेण्याजवळ समोर उड्डाणपुलाची गरज नसताना उड्डाणपूल टाकण्यात आलेला आहे. त्यामुळे पर्यटक या उड्डाण पुलावरून थेट पुढे निघून जातात. ज्या ठिकाणी सर्विस रोड देण्यात आलेला आहे त्या ठिकाणी देखील गांधार पाले लेण्यांचा उल्लेख असलेली कमान देखील लावण्यात आलेली नाही. उड्डाणपूल वरून गेल्यामुळे सर्विस रोड वर असलेल्या रेस्ट एरियाकडे कोण जाणार असा प्रश्न पडला आहे. यामध्ये नियोजनाचा अभाव असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

## स्कूल व्हॅन आणि रिक्षाला डंपरची धडक; दोन विद्यार्थी जखमी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल सिग्नल वर उभ्या असलेल्या स्कूल व्हॅन आणि रिक्षाला पाठीमागून आलेला डंपरने ठोकर मारून अपघात केला. या अपघातात स्कूल व्हॅन आणि रिक्षाचे मोठे नुकसान झाले. या अपघातात रिक्षाचालक, पॅसेंजर तसेच स्कूल व्हॅनमधील दोन मुले जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.



शनिवारी (दि.२०) सकाळी साडेअकराच्या सुमारास नवीन पनवेल सिग्नलजवळ स्कूल व्हॅन (एमएच ४६ बीयु ७१२३) आणि रिक्षा (एमएच ४६ सीडी ०९९५) या वाहनांना पाठीमागून आलेला डंपर (एमएच ०४ एफपी ९१४२)ने धडक दिली. अपघातात स्कूल व्हॅनचे दरवाजे लॉक झाल्याने मुले स्कूल व्हॅनमध्ये अडकून पडली. घटनास्थळी आणि आजूबाजूला असणारे पनवेल शहर वाहतूक शाखेचे अधिकारी, अंमलदार यांनी व्हॅनची काचेची खिडकी फोडून व बाजूचे पाईप ओढून बारा मुलांना व्हॅनमधून सुखरूपपणे बाहेर काढले. तसेच रिक्षाचालक हा रिक्षामध्ये अडकल्याने आणि जखमी झाल्याने रिक्षाची फ्रेम ओढून आणि फुटलेली काच तोडून त्याला बाहेर काढण्यात आले.

अपघात झाल्यानंतर डंपरचालकाला मारहाण करण्याचा प्रयत्न केला, मात्र वाहतूक पोलिसांनी या डंपर चालकाला पनवेल शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# प्रकाश देसाईंच्या वाढदिवसानिमित्त मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव!

**पाली : प्रतिनिधी**

पाली सुधागड सह रायगड जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाचे नेते प्रकाश देसाई यांचा वाढदिवस विविध सामाजिक, लोकोपयोगी व विधायक उपक्रमांनी धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त सालाबादप्रमाणे प्रकाश देसाई सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने १३वे वर्ष राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेला १८ डिसेंबर रोजी शानदार सुरवात करण्यात आली.



प्रकाश भाऊ देसाईंचा वाढदिवस म्हणजे विविध कार्यक्रमांची पर्वणी व मेजवानी आलीच. वाढदिवसानिमित्त प्रकाश देसाई यांना विविध क्षेत्रातील मान्यवर, हितचिंतक व मित्रपरिवार, पत्रकार, विविध पक्षाचे राजकीय नेते, प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, खेळाडू, पत्रकार, आदींनी प्रत्येक्ष भेटून तर हजारो चाहत्यांनी दूरध्वनी वरून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

पाली येथील त्यांच्या निवासस्थानी प्रकाश देसाई यांच्या पत्नी ज्योत्स्ना देसाई यांनी त्यांचे औक्षण केले. त्यानंतर त्यांना शुभेच्छा देण्यासाठी हजारोच्या संख्येने कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष भेटून गळाभेट घेत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

प्रकाशभाऊ देसाई यांना वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील, खासदार सुनील तटकरे, पेण सुधागड रोहा मतदारसंघाचे आमदार रवींद्र पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार पंडित पाटील, भाजप महिला मोर्चा रायगड जिल्हाध्यक्षा चित्राताई पाटील, रा.जि.प माजी अध्यक्षा ॲड : निलीमाताई पाटील, भाजप नेत्या गीताताई पालरेचा, ॲड. आस्वाद पाटील, भाजप युवा नेते वैंकुठ पाटील, आरपीआय रायगड जिल्हा संपर्क प्रमुख राहुल भाई सोनावळे, कोकण नेते रवींद्रनाथ ओव्हाळ, पाली नगरपंचायत नगराध्यक्ष पराग मेहता, आरिफ मणियार, सुलतान बेणसेकर, आलाप मेहता, प्रकाश कारखानीस, प्राचार्य लहूपचांग, राष्ट्रवादी काँग्रेस सुधागड तालुका अध्यक्ष संदेश शेवाळे, आगरी समाज अध्यक्ष ललित ठोंबरे, सचिव किरण खंडागळे, आदिवासी समाज नेते ॲड. रमेश पवार, प्रकाश देसाई सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष वेत्रवान गुरव व संपूर्ण टीम आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, पाली सुधागड वासीय जनतेने भरभरून शुभेच्छा दिल्या.

## महाड–बीड एसटी सुरू; प्रवाशांमध्ये समाधान

**महाड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या महाड आगारातून महाड बीड एसटी बस सेवा नुकतीच सुरू करण्यात आली आहे. यामुळे पुणे, बीड, जामखेड आधी ठिकाणी जाणाऱ्या प्रवाशांना या बसचा फायदा होत असल्याची माहिती आगार प्रमुख रितेश फुल पगारे यांनी दिली.

महाड एसटी आगारातून नुकतीच महाड बीड एसटी सेवा सुरू करण्यात आली आहे. या एसटीमुळे पुणे, जामखेड, बीड मधील प्रवाशांना लाभ मिळणार आहे. महाड बस स्थानकातून दररोज ८:३० वाजता सुटणार असून बीड मधून सकाळी ८ वाजता सुटणार आहे. लांब पल्ल्याची बस असल्याने लालपरी ही नवीन बस देण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहितीसाठी आगार प्रमुख रितेश फुलपागर आणि वाहतूक निरीक्षक उदय हाटे व अमोल खाडे यांच्या जवळ संपर्क साधावा, असे सांगण्यात आले आहे.



**चौक : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सन २०२६च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमास राष्ट्रवादीचे नेते सुरेश पाटील, गौरव दिसले, नितीन चौधरी, वैभव भोईर, रोशन खराळ, राहुल देसाई, विकी लाखन, रणजीत खराळ, रोहन मोरे, आकाश खराळ आदी उपस्थित होते.**

# विज्ञान, गणित विषयातील गुणवत्ता वाढीसाठी प्रशिक्षण

**माणगाव : बातमीदार**

विज्ञान व गणित विषयातील गुणवत्ता वाढवणे, संशोधन वृत्ती जोपासणे आणि विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण प्रयोगशीलता विकसित करणे या उद्देशाने ए.के.आय उर्दू हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज गोरेगाव माणगाव येथे आयराईज अर्थात कॅस्केड प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय भारत सरकार, आयशर पुणे ब्रिटिश कौन्सिल रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री टाटा टेक्नॉलॉजी आणि टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. १६ ते १८ डिसेंबर २५ रोजी जिल्हास्तरीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. सहा तालुक्यातील इयत्ता सहावी ते दहावी वर्गांना विज्ञान व गणित विषय शिकवणाऱ्या शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला एकूण साठ शिक्षकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.



जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. कामशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली व एकेआय उर्दू स्कूल अँड ज्युनियर कॉलेजचे मुख्याध्यापक मुनीर सर यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. या प्रशिक्षणासाठी तज्ञ म्हणून उस्मान शेख, नरेंद्र जाधव, विद्या साबळे, संतोष चौधरी यांनी काम केले तसेच आयसर संस्थेचे भरत ठोंबरे हे प्रमुख उपस्थित होते.

प्रशिक्षणाचा समारोप माणगाव तालुका गटशिक्षणाधिकारी श्रीमती तांबट यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. त्यामध्ये सर्व प्रशिक्षणार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी समन्वयक संतोष बेंदूगडे व स्वाती भुस्कुटे यांनी नियोजन करून सहकार्य केले.

## दुखवटा

### विजया रंधवे

**पनवेल :** अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील भांबोरा ग्रामपंचायतच्या माजी सदस्य विजया शंकर रंधवे यांचे बुधवारी (दि.१७) नवी मुंबई येथे झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७४ होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे व पतवंडे असा परिवार आहे. रयतसेवक व राष्ट्रीय लहुशक्ती संघटनेचे सरचिटणीस सागरकुमार रंधवे व निवेदक प्रा.संतोष उर्फ शंभू रंधवे यांच्या आई होत्या.



कै. विजया रंधवे यांचा दशक्रीया विधी (दि.२६) सिद्धटेक ता.कर्जत जि.अहिल्यानगर येथे होणार असल्याचे त्यांच्या कुटुंबीयांनी सांगितले.

## निवडक

### खारघरमध्ये सोनसाखळी चोरली

**पनवेल :** खारघरमध्ये चालत जाणाऱ्या एका महिलेची सोनसाखळी चोरांनी हिसकावल्याची घटना घडली. खारघर सेक्टर २१ येथील फडके उद्यानाशेजारी आइस्क्रीम खरेदी करून ५९ वर्षीय महिला घरी जात असताना मागून आलेल्या दुचाकीस्वारांनी त्यांच्या गळ्यातून सोनसाखळी खेचली. शिल्पचौकासमोरील मार्गाने धूम ठोकून पळून गेले. या घटनेबाबत महिलेने खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### रिक्षाच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**पनवेल :** रिक्षाने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात सम्यक वानखेडे हा तरुण जखमी झाला. अपघाताप्रकरणी रिक्षाचालकाविरोधात खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शशिकला वानखेडे या मानखुर्द पोलीस ठाण्यात शिपाई म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा मुलगा सम्यक स्कूटीने पापडीचा पाडा बसथांब्याकडे जात असताना रिक्षाने अचानक यू टर्न घेतला आणि स्कूटीला धडक दिली. अपघातात महिला पोलीस शशिकला वानखेडे आणि सम्यक दोघेही खाली पडले. यात सम्यक जखमी झाला. त्यानंतर रिक्षाचालकाने धक्काबुक्की करून पळ काढला. अपघातात दुचाकीचेही नुकसान झाले.

### डॉक्टरविरोधात बलात्काराचा गुन्हा

**पनवेल :** कळंबोलीत एका ५९ वर्षीय डॉक्टरने एका महिलेला लग्नाच्या भूलथापा देऊन गेल्या सात वर्षांपासून लैंगिक अत्याचार करत तिला लग्नास नकार देऊन मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कळंबोली पोलिसांनी पीडित महिलेच्या तक्रारीवरून आरोपी डॉक्टरविरोधात गुन्हा दाखल केला आहे. आरोपी डॉक्टर नेरूळ येथे राहण्यास असून त्याचा कळंबोली परिसरात दवाखाना आहे, तर ४९ वर्षीय पीडित महिला त्याच भागात राहण्यास असून दोघेही विवाहित असून त्यांना मोठी मुले आहेत. डॉक्टरने पहिल्या पत्नीपासून घटस्फोट घेऊन पीडित महिलेसोबत विवाह करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र डॉक्टरने तिला नकार देऊन मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# उरणमध्ये पोलिसांचा रूट मार्च

## नगर परिषद निवडणुकीचा आज निकाल

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

उरण नगर परिषद निवडणुकीचे मतमोजणीच्या अनुषंगाने उरण शहरात रूट मार्च घेतले. उरण नगर परिषद निवडणुक निकालाच्या अनुषंगाने २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार असल्याने १९ डिसेंबर रोजी सायंकाळी शहरामध्ये रूट मार्च वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आला.

रूटमार्च एसटी स्टँड चार फाटा येथुन सूरू होऊन पालवी हॉस्पिटल, कामठा रोड, एनआय हायस्कूलसमोरून स्वामी विवेकानंद चौक, गणपती चौक, राजपाल नाका मार्गाने कोटनाका येथे समाप्त करण्यात आला.

या रूटमार्चमध्ये उरण पोलीस ठाणेकडील निरीक्षक संजय जोशी, ०२ सपोनि/पोउपनि, २० अंमलदार तसेच पोलीस मुख्यालय येथील क्यूआरटी पथकाचे एक अधिकारी १२ अंमलदार व आरसीपी पथकाचा एक अधिकारी व २५ अंमलदार यांनी सहभाग घेतला होता. कोणताही अनुचित प्रकार होऊ नये, कायदा व सुव्यवस्था बिघडू नये यासाठी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्याची माहिती वरिष्ठ निरीक्षक हनिफ मुलाणी यांनी दिली.





# धावत्या ट्रेनमधून विद्यार्थिनीला खाली फेकले

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल-सीएसएमटी ट्रेनच्या महिलांच्या डब्यात प्रवेश करुन एका १८ वर्षांच्या महाविद्यालयीन विद्यार्थिनीला धावत्या ट्रेनमधून खाली ढकलल्याचा प्रकार समोर आला आहे. श्वेता महाडिक असे या विद्यार्थिनीचे नाव आहे. गंभीर जखमी झालेल्या श्वेताच्या जबानीनंतर रेल्वे पोलिसांनी शेख अख्तर नवाज नावाच्या आरोपीला अटक केली आहे.

श्वेता तिच्या मैत्रीणीसह खारघर येथील महाविद्यालयात जाण्यासाठी निघाली होती. दोघींनी पनवेल स्थानकावर पनवेल-सीएसएमटी लोकल पकडली. दोघीही लोकलच्या महिलांच्या डब्यात चढल्या. त्याचवेळी आरोपी शेखही महिलांच्या डब्यात शिरला. तेव्हा इतर महिलांनी त्याला डब्यातून खाली उतरण्यास सांगितले असता चिडलेल्या शेखने डब्याच्या दरवाजाजवळ उभ्या असलेल्या श्वेताला धावत्या ट्रेनमधून खाली ढकलले. श्वेता ट्रेनमधून खाली पडताच महिला प्रवाशांनी तत्काळ ट्रेनची चेन खेचून रेल्वे हेल्पलाइन क्रमांकावर माहिती दिली.

यानंतर लोकल खांदेश्वर स्थानकात येताच जीआरपी पोलिसांनी शेखला ताब्यात घेतले. श्वेताच्या गंभीर जखमा झाल्याने तिला तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# उरण नगर परिषद निवडणुकीच्या मतमोजणीसाठी प्रशासनही सज्ज

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**



२१ डिसेंबर रोजी होणाऱ्या उरण नगर परिषदेच्या मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज असल्याची माहिती उरण निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार डॉ. उद्धव कदम यांनी दिली. नगर परिषदेच्या नगराध्यक्ष व २१ सदस्य पदासाठी अशा एकूण २२ जागांसाठी दहा प्रभागातून मतदान झाले आहे. उरणच्या नगराध्य पदाची माळ कोणाच्या याकडे उरण वासियांचे लक्ष वेधले आहे.

चार वर्षाच्या प्रशासकीय राजवटीनंतर उरण नगर परिषदेच्या होणाऱ्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी चार उमेदवार व २१ सदस्य पदांसाठी अपक्षांसह विविध राजकीय पक्षांचे एकूण ४९ असे एकूण ५३ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. उरण नगर परिषदेच्या प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात रविवारी २१ मतमोजणीला पोलीस बंदोबस्तात सकाळी दहा वाजता सुरुवात केली जाणार आहे. दहा प्रभागासाठी दहा टेबल लावले आहेत. मतमोजणी नंतर दोन तासात सर्वच निकाल जाहीर होतील, अशी माहिती तहसीलदार उद्धव कदम यांनी दिली. न्यायालयाच्या आदेशानंतर मतमोजणी १८ दिवस लांबणीवर पडली होती.

दरम्यान, उरण नगर परिषदेच्या स्ट्राँग रूममध्ये कडेकोट पोलीस बंदोबस्तात ईव्हीएम मशीन ठेवलेल्या आहेत. पोलिसांबरोबर महाविकास आघाडीच्या उमेदवारांनीही स्ट्राँगरूमवर जागता पहारा ठेवला आहे. शुक्रवारी १९ डिसेंबर रोजी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली उरण शहरात रूट मार्च घेण्यात आला.

# सीकेटी विद्यालयात पारितोषिक वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात वार्षिक प्रथम पारितोषिक वितरण कार्यक्रम झाला.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक मंडळ सदस्य संजय भगत, संस्थेचे सभासद दर्शन ठाकूर, मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील तसेच बक्षीसपात्र विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




वर्षभरात घेण्यात आलेल्या शिक्षकदिन स्पर्धा, एनएसएस विभाग, विज्ञान प्रदर्शन, रांगोळी स्पर्धा, निवेदन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा, दिवाळी डेकोरेशन स्पर्धा, निबंध स्पर्धा, विविध विषय उपक्रम स्पर्धा, ऑलंपियाड स्पर्धा तसेच कबड्डी, खो-खो, बेसबॉल, क्रिकेट, डॉजबॉल, तायक्वांदो, बॅडमिंटन, किकबॉक्सिंग या विविध जिल्हास्तरीय स्पर्धेत यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आला. या कार्यक्रमात एकूण २२३ बक्षिसांचे वाटप करण्यात आले.

प्रस्ताविकात प्राचार्य प्रशांत मोरे यांनी संचालक मंडळाचे आभार मानले. विद्यालयाच्या क्रीडा महोत्सवात आपण जेव्हा भाग घेतो तेव्हा वर्षभराचा ताणतणाव निश्चितच दूर होतो. तसेच विद्यालयातील विविध उपक्रमाच्या माध्यमातून आपले सुप्तगुण किंवा क्रीडा विषयक गुण दिसून येत असतात. पारितोषिक मिळवण्यासाठी मेहनत आणि सराव करावाच लागतो तसेच त्यासाठी जिद्द असावी लागते, असे उद्गार प्रमुख पाहुणे संजय भगत यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. सहशिक्षिका अपर्णा मुकणे, योगिता जोरी यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले.

# संत गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्त कामोठ्यामध्ये स्वच्छतादूतांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ भारत सुंदर भारत या विचाराने रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय कामोठे येथे संत गाडगेबाबा महाराज पुण्यतिथी निमित्त पनवेल महानगरपालिकेच्या आमच्या शाळेच्या वार्डमधील स्वच्छता दूतांचा सन्मान करण्याचा एक अनोखा उपक्रम राबविला.

या कार्यक्रमावेळी प्रास्ताविकामध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी एम.के. कोंगेरे यांनी संत गाडगेबाबा महाराज यांच्या विचारांचे महत्त्व विविध उदाहरणातून सांगितले व परिसर स्वच्छ ठेवत असताना जे कर्मचारी हे काम करत आहेत त्यांचा सन्मान व्हावा ही कल्पना त्यांनी मांडली. मान्यवरांच्या उपस्थित गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



या वेळी विद्यालयाच्या स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य नारायण पोपेटा, ज्येष्ठ शिक्षक गावंड सर, गोवारी उपस्थित होते. पनवेल महानगरपालिकेमधील स्वच्छतादूत अनंता लोभी, रमाकांत गावंड, प्रतीक कडू, अर्चना पाटील, विमल गायकवाड, संजू चंदेरीया, कैलास कोळी तसेच सुपरवायझर अनुज घरत, गणेश भगत, कैलास भगत तसेच विद्यालयातील शिपाई राजू मोरे, महेंद्र कोळी, मंगल खिल्लारे या सर्वांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन करण्यात आला.

विद्यालयात शालेय विज्ञान प्रदर्शनांतर्गत प्रतिकृतीमधून निवडलेले प्रथम तीन क्रमांक व रांगोळी स्पर्धेतून निवडलेले प्रथम तीन क्रमांकाचे विद्यार्थी यांचा सन्मान स्वच्छता दूतांच्या हस्ते करण्यात आला. विद्यालयाकडून विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देण्यात आली.

# इनरव्हील क्लब ऑफ पनवेलचा निधी संकलन प्रकल्प उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेल यांच्या वतीने गोखले हॉल, पनवेल इथे आयोजित करण्यात आलेला निधी संकलन (Fund Raising) प्रकल्प मोठ्या उत्साहात शनिवार २० डिसेंबर व रविवार २१ डिसेंबर असा दोन दिवस चालू आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या व डॉक्टर डॉ. समिधा गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात समाजोपयोगी उपक्रमांसाठी निधी संकलन करण्याचा उद्देश असून, महिलांचा सहभाग लक्षणीय आहे. डॉ. समिधा गांधी यांनी इनरव्हील क्लबच्या कार्याचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे समाजातील गरजू घटकांना मदत मिळते, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन उत्कृष्ट पद्धतीने करण्यात आले आहे. इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्ष शुभांगी पिंपळकर, सेक्रेटरी डॉ. अमृता नाईक, प्रोजेक्ट हेड मीनल टिपणीस व वर्षा प्रशांत ठाकूर आणि सर्व सदस्यांनी कार्यक्रमसाठी परिश्रम घेतले. उपस्थित मान्यवरांनी उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाअंतर्गत मिळणारा सर्व निधी हा इनरव्हीलकडून विविध समाजोपयोगी कार्यासाठी वापरला जाणार आहे. या प्रदर्शनात अनेकविध साड्या, कपडे, गृहोपयोगी वस्तू, तयार रांगोळ्या, तोरण, दागिने असे भरपूर विविध स्टॉल आहेत. तसेच या उपक्रम मुळे पनवेल व आसपासच्या परिसरामधील महिला उद्योजकांना त्यांचे स्टॉल लावून त्यांची उत्पादने विक्रीस ठेवण्याची संधी मिळते. समस्त पनवेलकरांनी मोठ्या संख्येने जरूर यावे व सामाजिक कार्यामध्ये नक्की हातभार लावावा.



**पनवेल : जासई (ता. उरण) येथील साहिश सुरेश म्हात्रे याची भारतातील सर्वात मोठ्या टेनिस क्रिकेट स्पर्धा इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग (आयएसपीएल)मध्ये सिनेस्टार अक्षय कुमार यांच्या मालकीच्या श्रीनगर के वीर या संघात निवड झाली आहे. या निवडीबद्दल भाजपचे नेते, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी साहिशचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

# उरण शहरात तलाठी कार्यालयाची मागणी

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील विविध गावातून उरण तहसीलदार कार्यालयात नागरिक विविध शासकीय कामांसाठी येत जात असतात. त्या नागरिकांना तलाठीसाठी उरणवरून जेएनपीटी टाऊनशिप येथे सात किलोमीटर अंतरापर्यंत जावे लागत आहे, परंतु जेएनपीटी टाऊनशिपमध्ये कधी कधी काही कारणास्तव तलाठी भेटत नाहीत. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास होत आहे. याबाबत वंचित बहुजन आघाडीचे उरण तालुका उपाध्यक्ष तुषार गायकवाड यांच्याकडे यांनी तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांना पत्रव्यवहार करून सविस्तर चर्चा केली.

लवकरच जेएनपीटी वरून पुन्हा उरण शहरात तलाठी कार्यालय सुरु करण्यात येणार असे तहसीलदार उद्धव कदम यांनी आश्वासन दिले. उरण तालुकामधील नागरिकांना त्रास होणार नाही दक्षता घेतली जाईल, असे तहसीलदार उद्धव कदम यांनी आश्वासित केले.




# रात्रीस सिनेमाचा खेळ चाले....

रात्र ही झोपण्यासाठी असते आणि रात्री चांगली झोप लागली की दुसऱ्या दिवशी सकाळी मन ताजेतवाने, प्रफुल्लित असते आणि नवीन कामाला हुरूप येतो हे आता मुंबईसारख्या वेगवान आणि चोवीस तास कार्यरत असलेल्या शहरात जणू अर्धसत्य



झाले आहे, आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला लवकर झोप बघू असे सांगणे कालबाह्य झाले आहे...

मुंबईच्या मल्टीप्लेक्समध्ये रात्री अकरा साडेअकराला मिडनाईट मॅटीनी शो सुरू होऊनही दशकभरापेक्षा जास्त काळ लोटला आहे, पण आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंदर'च्या खणखणीत यशाने अनेक मल्टीप्लेक्समध्ये याच मिडनाईट मॅटीनी शोची संख्या वाढलीदेखील. पिक्चर चालतो तेव्हा अनेक गोष्टी चालतात. ब्रेकिंग न्यूजपासून रिलपर्यंत... चित्रपटाच्या जगात यशासारखे सुंदर आणि महत्त्वाचं असे काहीही नसते. पिक्चर सुपरहिट है तो सबकुछ फिट्ट है असा हा मामला आहे. चित्रपट सुपरहिट झाला रे झाला की चित्रपटसृष्टीतील अनेक लहान मोठ्या समस्या, चिंता (त्या का करतात?), विवंचना अचानक दूर जातात. आता 'धुरंदर'च्या खणखणीत यशाने काही मल्टीप्लेक्समधील रात्रीच्या खेळाच्या वेळा अशा झाल्या, रात्री बारा वाजून पन्नास मिनिटे, रात्री एक वाजून पंचवीस मिनिटे, त्यानंतर रात्री अडीच, तीन, साडेतीन, पहाटे चार वाजता. अगदी पुणे शहरातही एका मल्टीप्लेक्समध्ये रात्री सव्वा बारा वाजता एक खेळ.

चित्रपटासाठीच्या या वेळा आश्चर्यचकित व्हावे अशा आहेत. या नक्की कोणासाठी आहेत? उच्चभ्रू आणि नवश्रीमंत वर्गातील गाडीवाल्या चित्रपट रसिकांसाठी आहेत. नव्वदच्या दशकाच्या उत्तरार्धात हा उच्च मध्यमवर्ग अधिक श्रीमंत झाला आणि त्याचे थेट परिणाम चित्रपट संस्कृतीवरही दिसू लागले. त्याची सुरुवात राजश्री प्रॉडक्शन निर्मित व सुरजकुमार बडजात्या दिग्दर्शित हम आपके है कौन (१९९४) या चित्रपटाने झाली. मुंबईत एकमेव चित्रपटगृह लिबर्टीत हा चित्रपट प्रदर्शित होताना शनिवार आणि रविवार या दिवशी तिकीटाचे दर चांगलेच चढे होते. बाल्कनीचा तिकीट दर चक्क तीन आकडी होता. ही एका नवीन युगाची सुरुवात होती. तेव्हा जे पेरले गेले ते आता मोठ्याच प्रमाणावर उगवले आहे.

नवीन दशकाच्या सुरुवातीला मोठ्या शहरात आलेले मल्टीप्लेक्स युग काही फार फार वर्षांनी फोफावले. त्याचे हायफाय व्यक्तीमत्व आणि तिकीटाचे चढे दर यांनी आपल्या देशात चित्रपट रूजवलेल्या, वाढविलेल्या अशा मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय अशा टाळ्या शिट्यांनी थिएटर




डोक्यावर घेऊन पिक्चर एन्जॉय करत करत मजेत असलेल्या मास अपिलला मागे सारले.

मल्टीप्लेक्स कोणासाठी आहेत? तर स्वतःची चार चाकी गाडी असणारे, महागडे तिकीट ऑनलाईन बुक करणारे, समोसा पॉपकॉर्न आणि शीतपेये यांचा आस्वाद घेत घेत चित्रपट पाहणारे, यांच्यासाठी! अशी एक सर्वसाधारण व्याख्या.

तसं पाहिलं तर रात्रीचा चित्रपट हा खेळ नवा नाही. आपल्या देशात १९८२ साली रंगीत दूरदर्शन व चित्रफित (व्हिडीओ) यांचे आगमन झाले आणि मग साखरपुडा, लग्न, बारसे, सत्यनारायण पूजा, वाढदिवस अशा निमित्ताने

चाळीचाळीतून भाड्याने व्हीसीआर आणणं, अख्खा चाळीने गोणपाट, वृत्तपत्र अथवा आपली घरातील खुर्ची बाहेर टाकून सगळ्यांनी दाटीवाटीने बसून पिक्चर एन्जॉय करणं सुरू केलं तेव्हाच ही रात्रभरचा पिक्चर रूजत गेला. दहा पंधरा रुपयांत एका चित्रपटाची व्हिडीओ कॅसेट भाड्याने आणायची आणि एका रात्रीत चार चित्रपट पहायचा आनंद घ्यायचा असे अगदी सोप्पे गणित. पिक्चर कोणाचे? तर मिथुन चक्रवर्तीचे. डोक्याला कसलाही ताप वा शॉट नाही. त्याची तीन चार भन्नाट नृत्य (त्यात डिस्को डान्स आहेच) आणि त्याची ढिश्यूम ढिश्यूम मारधाड. एकदम पैसा वसूल मनोरंजन. त्याचे सुरक्षा, वारदात, डिस्को डान्सर, डान्स डान्स, कसम पैदा करने वाले की, मकसद हे चित्रपट गल्लीबोळातून, चाळीचाळीतून पाहिले गेलेत. भले त्याच्या सुपरहिट चित्रपटांना प्रतिष्ठा नसेल, पण हुकमी प्रेक्षकवर्ग होता.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

त्या दिवसात रात्रीच्या बससेवेत प्रवासात व्हिडीओवर एक दोन चित्रपट हमखास पाहता येई. त्यात अमिताभ बच्चनच्या कुली, शान, शक्ती, मुकद्दर का सिकंदर, याराना, लावारिस अशा चित्रपटांना स्थान असे. रात्रीच्या प्रवासात कंटाळा येऊ नये म्हणून ही सोय होती. चित्रपट कसा पहावा यापेक्षा चित्रपट कसाही पहावा हेच खरे.

रजनीकांत क्रेझने नवीन चित्रपटाचा पहिल्या दिवशी शुक्रवारी पहाटे साडेपाच वाजताचा खेळ ही संस्कृती रूजवली. या खेळासाठी त्याचे चाहते ढोल ताशा बॅण्ड बाजा वाजवत, नाचत येणं आणि रजनीकांतच्या भल्या मोठ्या कटआऊटला दुधाची अंघोळ घालणे ही चित्रपट रसिक संस्कृती एकदम भन्नाट. यातून चित्रपट रसिकांमधील आणखी एक वैशिष्ट्य दिसून येते. रजनीकांतवरील प्रेमाखातर हे सगळे असते. रजनीकांतच्या चित्रपटात पाहण्यासारखे असं असते तर काय या प्रश्नापेक्षा त्याच्या चित्रपटाचे हे उत्स्फूर्त स्वागत खूप खूप मोठी गोष्ट. तात्पर्य, रजनीकांतचा पिक्चर पाहण्यासाठी रात्रीपासून वाट पाहिली जाते.

मोबाईल स्क्रीन, लॅपटॉप, ओटीटी युगात आपण चित्रपट कधी पहायचा हे आपण ठरवतो. मग ती वेळ रात्री उशिरा अथवा पहाटे लवकरची असू शकते. काय फरक पडतो? म्हणजे पुन्हा तेच, रात्रीस सिनेमाचा खेळ चाले...

फार पूर्वी एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्स संस्कृतीत सिनेमाची वेळ जणू ठरलेली. सकाळी साडेअकरा वाजताचा खेळ हा मॅटीनी शो आणि मग दिवसा तीन खेळ तीन, सहा आणि रात्री नऊ... यात चित्रपट चौदा रिळाचा असेल तर साडेतीन, साडेसहा आणि साडेनऊ वाजता आणि चित्रपट अठरा, वीस रिळाचा असेल तर अडीच, साडेपाच आणि नऊ अशी.

चित्रपट रसिकांच्या अनेक पिढ्यांनी चित्रपटगृहाच्या अशा वेळा जणू पाळल्या. ती एक सांस्कृतिक सवय होती. नव्वदच्या दशकाच्या अखेरीपर्यंत तर चित्रपटाचा रात्रीचा खेळ पहायचा तर फार लांबचे चित्रपटगृह नको अशी भावना असे.

तालुक्याच्या ठिकाणचे चित्रपटगृह असो किंवा खेड्यापाड्यांतील थिएटर असो, रात्रीचा खेळ बारा वाजता संपवला जाई. आमिर खान निर्मित आणि आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित लगान (२००१)मधील क्रिकेट सामन्यावर ग्रामीण भागातील सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये चक्क कात्री लावली गेली. रात्री बारा वाजता सिनेमा संपल्यावर टमटम (अथवा सितारा. अर्थात रिक्षा) मिळणे, स्वतःच्या सायकल, स्कूटर, मोटरसायकलने प्रेक्षकांनी गावातील घरी पोहचणे, टेम्पो असेल तर त्यातून जाणे या सगळ्याचा विचार करूनच रात्रीचा चित्रपट बारा वाजता संपवला जाई. (फार पूर्वीच्या काळात गावावरुन बैलगाडी किंवा घोडे गाडीने प्रेक्षक चित्रपट पहायला येत. चित्रपट प्रेक्षक संस्कृती हा असा बहुस्तरीय आणि रंजक विषय) आज मुंबईत मल्टीप्लेक्समध्ये रात्रभर चित्रपट एन्जॉय करण्याची रुजलेली संस्कृती पाहता हा फ्लॅशबॅक भन्नाटच म्हणायचा.

एकदा तर प्रीमियर खेळच रात्री उशिरा सुरू झाला आणि तो पहायला अगदी काही मोजकेच मान्यवर सत्तर एमएमचा रूपेरी पडदा आणि स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम यांच्या समोर होते. तब्बल पन्नास वर्षे हा किस्सा गाजतोय,


जी.पी. सिप्पी निर्मित आणि रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले'च्या मिनर्व्हा चित्रपटगृहातील प्रीमियरला सत्तर एमएमची प्रिंट वेळेवर न पोहचल्याने पस्तीस एमएममध्ये तो खेळ पार पडला आणि तो संपल्यावर सत्तर एमएमची प्रिंट मिनर्व्हावर पोहचली (लंडनमध्ये तांत्रिक प्रगतीने हा चित्रपट सत्तर एमएम करण्यात आला. शोलेच्या काही मोजक्याच प्रिंट सत्तर एमएम होत्या.) रात्री उशिरा दिग्दर्शक रमेश सिप्पी, छायाचित्रणकार व्दारका दिवेचा, अमिताभ आणि अशाच



काही मोजक्याच जणांनी सत्तर एमएम आणि स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीममध्ये शोले पाहिला.

चित्रपटगृहात रात्री उशिराचा खेळ ही संस्कृती अशी. आता कोणी तिकीट काढून वातानुकूलित व्यवस्थेत केवळ आणि केवळ झोपण्यासाठी रात्रीचा चित्रपट खेळ पहायला जाऊदेखील शकतो. फरक इतकाच की पडद्यावरील डायलॉगबाजीचा आवाज म्यूट करता येणार नाही.

# जनकवी पी. सावळाराम



कल्पवृक्ष कन्येसाठी, गंगा यमुना डोळ्यात उभ्या कां?, लिंबलोण उतरता, जिथे सागरा धरणी मिळते, सप्तपदी ही रोज चालते, रिमझिम पाउस पडे सारखा, घट डोईवर अशा एकसे एक सुंदर गाण्यांचे जनक म्हणजे गीतकार पी. सावळाराम. त्यांचे खरे नाव निवृत्ती रावजी पाटील. आज त्यांचा स्मृतिदिन...

पी. सावळाराम यांचा जन्म ४ जुलै १९१४ रोजी झाला. शालेय वयापासूनच त्यांना काव्याची गोडी लागली होती. पुढे ते शिक्षणासाठी सांगलीला महाविद्यालयात दाखल झाले. तेथे त्यांना तिथे शिक्षक लाभले, ते थोर कवी माधव ज्युलियन म्हणजेच प्रोफेसर माधवराव पटवर्धन. तेथेच या सर्जनशील मनाच्या पी. सावळाराम यांची काव्यकळा फुलू लागली. महाविद्यालयीन शिक्षणानंतर ते ठाणे येथे रेशनिंग ऑफिसमध्ये नोकरीसाठी रुजू झाले. काव्याची उर्मी त्यांना गप्प बसू देत नव्हती.

पी. सावळाराम यांचा चित्रपट गीतलेखनातही योगायोगानेच प्रवेश झाला. 'राम राम पाव्हणं' या चित्रपटाचे दिग्दर्शक दिनकर पाटील प्रथमच दिग्दर्शन करत होते. त्यांच्या चित्रपटाला संगीत लता मंगेशकर देणार होत्या. त्यातील गाणी शांता शेळके यांनी लिहिली, पण त्यातल्या लावण्या तुम्ही दुसऱ्या कुणाकडून तरी लिहून घ्या, असे शांताबाईंनी सांगितल्यावर, पाटील यांना आपल्या कॉलेजमधल्या कवीमित्राची म्हणजे सावळाराम यांची आठवण झाली. सावळाराम यांनी त्यांना दोन दिवसांत लावण्या लिहून दिल्या. या लावण्यांसाठी मात्र सावळाराम यांच्या आग्रहावरून त्यांचा आकाशवाणीमुळे मित्र झालेल्या वसंत प्रभू यांना संगीत देता आलं. तेव्हापासून दिग्दर्शक दिनकर पाटील, संगीतकार वसंत प्रभू व गीतकार पी. सावळाराम ही त्रिमूर्ती मराठी चित्रपटाला लाभली. त्याकाळी मराठी चित्रपटसृष्टीत पाटील–प्रभू–सावळाराम हे तिघे एका बाजूला, तर दुसऱ्या बाजूला राजा परांजपे, सुधीर फडके, ग.दि. माडगुळकर ही त्रयी होती.

एचएमव्ही कंपनीच्या वसंत कामेरकरांनी त्यांना संधी दिली आणि पी. सावळाराम यांची गट्टी जमली ती संगीतकार वसंत प्रभू यांच्याशी. त्यांची पहिली दोन गाणी प्रसिद्ध झाली, ती निवृत्ती पाटील या नावाने, पण त्याच वेळी नागपूर आकाशवाणी केंद्रावर निवृत्ती पाटील नावाचे बासरीवादक कलाकार होते, या नामसाधर्म्यातून त्यांना बाहेर यायचे होते, त्या वेळी पी. सावळाराम यांचे एक मित्र उपयोगाला आले. ते मित्र होते विधानसभेचे माजी अध्यक्ष वि.स. पागे. पागे यांना ह.ना. आपटे यांच्या त्या वेळी गाजत असलेल्या, 'उषःकाल' कादंबरीमधील 'सावळ्या' या व्यक्तिरेखेने भारावून टाकले होते. पागे यांना, आपला मित्र निवृत्ती पाटील याच्या व्यक्तिरेखेत या 'सावळ्या'चे साधर्म्य जाणवायचे. ते निवृत्ती पाटील यांना 'सावळ्या' नावाने हाकारायचे. निवृत्ती पाटील यांनी ते नाव पी. सावळाराम असे धारण केले.

१९४९मध्ये 'राघु बोले मैनेच्या कानात गं' हे पहिले गीत त्यांनी लिहिले. वसंत प्रभू, माधव शिंदे व दिनकर पाटील हे त्यांचे स्नेही होते. मराठी चित्रपटांचा तो ऐन बहराचा काळ होता. जिथे चित्रपटगृहे होती, तिथे प्रदर्शित होणाऱ्या बऱ्याच चित्रपटांतून पी. सावळारामांची गाणी असायची. सर्वसामान्य लोकांपर्यंत ती अशी थेटपणे पोहचली होती, परंतु पी. सावळाराम यांच्या गीतांचा संग्रह फार उशिरा म्हणजे १९९१ साली कुसुमाग्रजांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध झाला. त्याआधी कित्येक वर्षे तुकारामांच्या अभंगांप्रमाणे सावळारामांची गीते लोकांच्या मनात आणि कंठात कायमची बसली होती.


पी. सावळाराम यांना सामाजिक कार्याची ओढ होती. १९६४–६५ साली ते ठाण्याचे नगराध्यक्ष झाले. येऊर पाणी योजना आणि ड्रेनेज सिस्टीमसंबंधी त्यांनी विशेषत्वाने लक्ष घालून त्या योजना पूर्णत्वास नेल्या. शिक्षकांच्या पगारात त्यांच्याच काळात वाढ झाली. ६३–६४ साली ते शिक्षण समितीचे सभासदही राहिले. ठाण्याच्या ज्ञानसाधना कॉलेजच्या स्थापनेत इतरांबरोबर त्यांचाही सहभाग होता. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कॉलेजने 'पी. सावळाराम गौरवग्रंथ' प्रकाशित केला.

पी. सावळाराम यांची गीते अशी लोकमानसात त्यांचा ठेवा म्हणून स्थिरावली आहेत. संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यांच्या अभंग व ओव्यांना हे भाग्य लाभले होते. अलीकडल्या काळात ग. दि. माडगूळकर यांच्या बरोबरीने कवी पी. सावळाराम यांना ते लाभले. या अर्थाने ते 'जनकवी' आहेत. 'ज्ञानदेव बाळ माझा', 'विठ्ठल तो आला आला' व 'सखू आली पंढरपुरा' ही गीते लोकभाषेच्या जवळ जाणारी आणि तिच्यातील नादमाधुर्य टिपणारी आहेत. त्याचबरोबर एखादी लावणी लिहिताना ते लावणीचा म्हणून जो ठसका असतो, तोही ते नेमक्या शब्दांमध्ये टिपतात. उदाहरणार्थ, 'काल रातीला सपान पडलं' किंवा 'तुला बघून पदर माझा पडला' या त्यांच्या लावण्या पाहाव्यात.

सावळारामांनी जवळजवळ सातशे–आठशे गीते लिहिली. त्यांपैकी पाचशे–सहाशे रेकॉर्डवर आली. पी. सावळाराम यांना 'जनकवी' ही उपाधी देताना कुसुमाग्रजांना नेमके काय अभिप्रेत होते, हे त्यांनी पुढील शब्दांमध्ये व्यक्त केले आहे. 'पी. सावळाराम त्यांच्या रसपूर्ण आणि भावगर्भ गीतांच्याद्वारे महाराष्ट्रातील असंख्य घरांपर्यंत नव्हे, घरातल्या स्वयंपाकघरांपर्यंतही पोहोचले आहेत. खानदानी दिवाणखान्यापासून गोरगरीबांच्या ओटी–ओसरीपर्यंत सर्वत्र या नावाचा संचार झाला आहे. नागरवस्तीच्या वेशीवरच ते थांबले नाहीत, ग्रामीण भागातील झोपडय़ांत आणि चावडी–चव्हाट्यावरही त्यांचे स्वागत झाले आहे.' १९८२ सालच्या 'गदिमा' पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. पी. सावळाराम यांचे २१ डिसेंबर १९९७ रोजी निधन झाले.

**–संजीव वेलणकर**
**(बाईट्स ऑफ इंडिया)**

# माळेगाव यात्रा : ग्रामीण संस्कृतीची प्रयोगशाळा!



मराठवाडा संतांची, वीरांची भूमी आहे. याच भूमीतील नांदेड जिल्ह्यात माळेगाव आहे. लोहा तालुक्यातील या गावात मोठी यात्रा भरते. ही यात्रा मार्गशीर्ष अमावास्येला सुरू होते. दक्षिण भारतात ही यात्रा अत्यंत प्रसिद्ध आहे. माळेगाव केवळ धार्मिक स्थळ नाही. ते ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देणारे मोठे व्यापारी केंद्र आहे. ही यात्रा १८ ते २५ डिसेंबरदरम्यान सुरू आहे. त्यानिमित्ताने या यात्रेवर प्रकाश टाकणारा हा लेख.

माळेगाव यात्रेला जवळपास चार शतकांची परंपरा आहे. मोगल, निजाम काळापासून या यात्रेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ऐतिहासिक काळापासून माळेगाव घोड्यांच्या व्यापारासाठी प्रसिद्ध आहे. आजही तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील व्यापारी येथे येतात. या ठिकाणी महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या खंडोबाचे देखणे, सुंदर असे मंदिर आहे.

माळेगाव यात्रा म्हणजे लोककलांचे माहेरघरच. येथे कलगी–तुरा, वाघ्या–मुरळी, गोंधळ आणि भारूड सादर होतात. तमाशा, लावणी येथील मुख्य आकर्षण असते. नामांकित तमाशा फडांची जुगलबंदी येथे रंगते. तमाशासोबतच



'मौत का कुआँ'सारखे प्रकारही येथे दिसतात.

इतर यात्रांमध्ये प्रामुख्याने फक्त देवदर्शन असते, पण माळेगाव यात्रा वेगळी आहे. येथे कृषी प्रदर्शन आणि कुस्त्यांची दंगल पाहायला मिळते. पशु प्रदर्शन या यात्रेचे हृदय आहे. येथे हजारो जनावरांची खरेदी–विक्री होते. राजस्थानच्या पुष्कर मेळ्यानंतर घोड्यांच्या व्यापारासाठी ही दुसरी मोठी बाजारपेठ आहे. यात्रेत सर्वधर्मीय लोक आनंदाने सहभागी होतात. ही यात्रा म्हणजे उत्तम, असे सामाजिक सलोख्याचे प्रतीकच आहे.


माळेगाव यात्रा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पाच ते सात दिवसांतच येथे कोट्यवधींची उलाढाल होते. चेतक, मारवाडी, पंजाबी अशा उच्च जातीचे घोडे विक्रीला येतात. या घोड्यांची खरेदी–विक्री किंमत चकित करणारी असते. यासह येथे गाढवांचीही मोठी बाजारपेठ भरते. वीटभट्टी व्यावसायिक आणि परराज्यातील व्यापारी येथे गाढवे खरेदी करतात. याशिवाय उंट, बैल, गायी आणि शेळ्या–मेंढ्यांचीही विक्री होते. कृषी अवजारे आणि खाद्यपदार्थांचीही मोठी उलाढाल होते.

अडचणीच्या काळात ही यात्रा शेतकऱ्याला आधार देते. पशुधन विकून आलेला पैसा शेतीसाठी वापरला जातो. यात्रेत शेतकऱ्यांना नवीन बियाणे आणि तंत्रज्ञानाची माहिती मिळते. तसेच यात्रेतून स्थानिक मजुरांना रोजगार मिळतो. पूर्वी यात्रेत कृषी विषयक वस्तूंची देवाण–घेवाण होत असे. आता रोखीने आणि 'युपीआय'द्वारे व्यवहार होतात. पूर्वी बैलगाडीतून येणारे भाविक चारचाकी गाड्यांमधून येतात.



माळेगावची ही यात्रा केवळ उत्सव नाही. ती ग्रामीण संस्कृतीची एक प्रयोगशाळा आहे. आधुनिकीकरणाच्या काळातही यात्रेने आपली ओळख जपली आहे. हजारो हातांना काम देणारी ही यात्रा खऱ्या अर्थाने 'वैभवशाली' अशीच आहे.

**–डॉ. श्याम टरके,**
सहाय्यक संचालक
(माहिती)



# पन्हाळगडाच्या विकासाकडे लक्ष देण्याची मागणी

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील लोणेरे परिसरात वसलेला ऐतिहासिक पन्हाळगड दुर्ग आजही विकासाच्या प्रतीक्षेत आहे. या गडाचा सर्वांगीण विकास झाल्यास परिसरातील युवकांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन रोजगारासाठी गाव सोडून होणारे स्थलांतर थांबण्यास मोठी मदत होईल, असे मत स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.



पन्हाळगडावर 'स्वाराज्याचा मावळा' या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून सातत्याने ऐतिहासिक जतन व संवर्धनाचे काम सुरू आहे. या संघटनेने गडावरील अनेक पाण्याची टाके स्वच्छ करून त्यांचे पुनरुज्जीवन केले आहे. तसेच गडावरील प्रत्येक अवशेष शोधण्याचा, इतिहास उजेडात आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न ते सातत्याने करत आहेत. केवळ गड संवर्धनच नव्हे, तर त्यांच्या पुढाकाराने विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीचे कार्यक्रमही नियमितपणे आयोजित केले जातात.

पन्हाळगडाच्या पायथ्याशी पन्हळघर बुद्रुक, पन्हळघर खुर्द, वाघोसे, खडकोळी, मांगरुळ, अंबर्ले, पहेल आदी अनेक गावे वसलेली आहेत. या गावांतील नागरिकांची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेती व मजुरीवर अवलंबून आहे. गडाचा पर्यटनदृष्ट्या विकास झाल्यास स्थानिक युवकांसाठी मार्गदर्शक, पर्यटक सेवा, लघुउद्योग, हस्तकला, हॉटेल व्यवसाय, वाहतूक आदी माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होऊ शकते.

# नगराध्यक्षासह २० सदस्यांच्या निकालासाठी महाड प्रशासन सज्ज

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगरपालिकेचा एक नगराध्यक्ष व २० सदस्यांचा निकाल रविवार २१ डिसेंबर रोजी होणार असून महाड नगरपालिकेच्या इमारतीत दुसर्या मजल्यावर १० टेबलवरुन मतमोजणी होणार असून या साठी प्रशासन व पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. सकाळी ९ वाजता निकाल प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.




महाड नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ चा निकाल रविवार, २१ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजले पासून निवडणूक निरीक्षक प्रतिमा पुदलवाड यांच्या नियंत्रणा खाली निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार महेश शितोळे यांच्या उपस्थितीत निकाल प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. एक नगराध्यक्ष व २० सदस्य यांची १० टेबल वरून निकाल यंत्रद्वारे निकाल घोषित होणार आहे. एकूण २६ मतदान केंद्रांवर ६ प्रभागात ३ मतदान केंद्र व ४ प्रभागात २ मदान केंद्रावरुन एकूण १६,४२६ एवढे मतदान झाले आहे. त्यामुळे ६ प्रभागांचे तिन फेर्यांमधुन व ४ प्रभागात २ फेऱ्यांमधुन निकाल घोषित होणार आहेत.

सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी ओळखपत्रासह सकाळी ८:३० वाजता उपस्थित रहाव, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी महेश शितोळे यांनी केला आहे. मतदाना वेळी झालेला राडा व तणावाचे वातावरण पहाता निकाला दिवशी पोलीस उपविभागीय अधिकारी शंकर काळे यांच्या मार्गदर्शना खाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. तसे राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ८ चे युनिट तैनात करण्यात आले आहे.

# अमली पदार्थ उत्पादन उपकरणांची ओळख; खालापूर पोलिसांचा उपक्रम

**चौक : प्रतिनिधी**

अमली पदार्थ उत्पादन उत्पादन उपकरणांची ओळख व्हावी आणि संशयित यांची माहिती जमा करण्यासाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन खालापूर पोलीस यांनी केले होते. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण योगेश गोरे व अन्न व औषध विभाग पेण येथील प्रकाश कोळी यांनी मार्गदर्शन केले.

खालापुर विभागातील पोलीस पाटील, हॉटेल,फार्म हाउस, रिसॉर्ट मालक यांची संयुक्त बैठक खालापूर पोलीस ठाण्यात घेण्यात आली. परिसरातील सुरू व बंद असलेल्या रासायनिक कंपन्या व फार्म हाउसमध्ये अंमली पदार्थ उत्पादन करतांना येणारी उपकरणे यांची ओळख होण्याकरीता तसेच संशयित कंपन्यांची माहीती गोळा करतांना घ्यावयाची दक्षता याबददल महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण योगेश गोरे व अन्न व औषध विभाग पेण येथील प्रकाश कोळी यांनी मार्गदर्शन केले.



या वेळी उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ विशाल नेहुल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, पोलीस उप निरीक्षक शिवाजी जुंदरे उपस्थित होते. येणाऱ्या ख्रिसमस व ३१ डिसेंबर च्या अनुशंगाने खालापूर तालुक्यात कार्यक्रमाकरीता येणाऱ्या पर्यटकांची माहीती घेणेकरीता रजिस्टर अदयावत करणे, हॉटेल फार्म हाउस, रिसॉर्टमध्ये उच्च प्रतीचे नाईट व्हिजन सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, कार्यक्रमात महिला, मुली यांची छेडछाड, विनयभंग, नशेमध्ये दंगा न करणे, तसेच गांजा, चरस, गुंगी येणाऱ्या पदार्थाचे सेवन करणे यासारखे प्रकार होणार नाहीत. कार्यक्रमाची परवानगी आपले सरकार या पोर्टल वरून ऑनलाईन पध्दतीने,पोलीस विभाग व संबंधीत विभागाकड्डुन घ्यावी. ३१ डिसेंबर रोजी रात्री १२.०० वा. नंतर ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास परवानगी नाही याबाबत गाव पोलीस पाटील यांना मार्गदर्शन व सुचना देण्यात आल्या.

उपविभागीय पोलीस अधिकारी खालापुर विभाग खालापुर, खालापुर विभागातील १० पोलीस अंमलदार, ५५ पोलीस पाटील, ३५ हॉटेल,फार्म हाउस रिसॉर्ट मालक, व्यवस्थापक व सर्व पोलीस पाटील हजर होते.

# अंजुमन महाविद्यालयात आरोग्यविषयक प्रशिक्षण

**मुरूड :** प्राचार्य डॉ. साजिद शेख व ला. मकरंद कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली लायन्स क्लब ऑफ मुरूड-जंजिरा व लायन्स क्लब ऑफ श्रीबाग यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरूड-जंजिरा येथे तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, नेरूळ-नवी मुंबई यांच्या सहकार्याने 'लाइफलाईन स्किल्स कार्यशाळेद्वारे हृदयविकार प्रथमोपचार (सीपीआर), मानसिक व महिलांचे आरोग्यविषयक या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेमध्ये महाविद्यालयातील १०० विद्यार्थी व मुरूड तालुक्यातील ३५ आशा सेविकांनी प्राची चौलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेतला. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्य, महिला स्वच्छता आणि आपत्कालीन वैद्यकीय मदतीबाबत प्रत्यक्ष व उपयुक्त ज्ञान प्राप्त होईल असे डॉ. साजिद शेख यांनी प्रतिपादन केले.

या प्रशिक्षणादरम्यान डॉ. अजय बाल्की यांनी मानसिक आरोग्याचे महत्त्व, तणाव व्यवस्थापन, भावनिक संतुलन व सकारात्मक जीवनशैली याविषयी मार्गदर्शन केले. स्पर्धात्मक जीवनात मानसिक स्थैर्य जपणे किती आवश्यक आहे, यावर त्यांनी विशेष भर दिला. डॉ. वृती शेठ व डॉ. पद्मजा यांनी महिलांचे आरोग्य व त्यांना भेडसावणाऱ्या समस्या या विषयावर संवाद साधत आरोग्यविषयक जागरूकता निर्माण केली.



# शिहू येथील शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन

## पारितोषिक वितरण व विविध कार्यक्रम

**पाली : प्रतिनिधी**

माध्यमिक शाळा शिहू चे वार्षिक स्नेहसंमेलन , पारितोषिक वितरण व विविध गुणदर्शी कार्यक्रम वर्ष २०२५- २६ या वर्षी अत्यंत उत्साही वातावरणात साजरे करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे सभापती डॉ. रोहिदास नारायणराव शेळके यांनी भूषविले. तर प्रमुख पाहुणे रिलायन्सचे वरिष्ठ अधिकारी श्रीकांत गोडबोले, कामगार नेते जनार्दन शेळके, डॉ जी.एस.कोकणे, डॉ.सुनील पाटील, डॉ व्ही. आर. शिंदे , के.के.कुथे, पांडुरंग गदमळे, जीवन शेळके, बा.प.पाटील , वे. सो. खाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव देणारे विविध सांस्कृतिक व गुणदर्शी कार्यक्रम घेण्यात आले. तर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रातील यशाचे कौतुक म्हणून गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा पार पडला.

या वेळी शाळेला अनेक मान्यवरांकडून आर्थिक सहाय्य करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक विजयकांत



पाटील, स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष प्रमोदिनी कोकाटे, भाग्यश्री नेरपगार, साधना पाटील, विद्यार्थिनी प्रतिनिधी भाविका म्हात्रें, विद्यार्थी प्रतिनिधी भावेश कोकाटे आदींसह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विज्ञान प्रदर्शनाने बालवैज्ञानिक तयार होण्यास मदत होते -संदीप कराड

**चौक : प्रतिनिधी**

विज्ञान प्रदर्शन घेतल्याने ते विद्यार्थ्यांना विज्ञानाची आवड निर्माण करते, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते. प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देण्यास आणि दैनंदिन जीवनातील वैज्ञानिक संकल्पना समजून घेण्यास मदत करते, यातूनच नवीन कल्पनांना चालना मिळते आणि आपल्यासारखे बालवैज्ञानिक तयार होऊन आत्मनिर्भर भारत निर्माण करतील, असे प्रतिपादन खालापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी संदीप कराड यांनी केले.

खालापूर तालुका स्तरीय ५३ वे विज्ञान प्रदर्शनाचे बक्षीस वितरण गटविकास अधिकारी संदीप



कराड यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. या वेळी गट शिक्षण अधिकारी दीपा परब, जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्ट नढाळ प्रमुख ममता म्हात्रे व पंचायत समिती अधिकारी, केंद्रप्रमुख उपस्थित होते.

या विज्ञान प्रदर्शनात एकूण ११३ प्रतिकृती मांडण्यात आल्या होत्या. ते पुढे म्हणाले विद्यार्थ्यांनी लहानपणापासून विज्ञानाविषयी आवड असणे महत्त्वाचे आहे.

विकसित व आत्मनिर्भर भारत या संकल्पनेवर आधारित STEM (सायन्स, टेक्नॉलॉजी, इंजिनिअरिंग, मॅथेमॅटिक्स) थीमवर हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. देशाच्या संरक्षणातील क्षेपणास्त्र प्रतिकृती ठेवण्यात आल्याने राष्ट्रभक्तीची भावना अधिक बळावली होती.या प्रदर्शनात प्राथमिक विभाग ७० प्रतिकृती, प्राथमिक आदिवासी विभाग १ प्रतिकृती, विभाग २७ प्रतिकृती, शिक्षक प्रतिकृती प्राथमिक १४, माध्यमिक पाच प्रतिकृती सादर करण्यात आल्या. या वेळी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

गटशिक्षणाधिकारी दीपा परब, आयोजक हिमांशू दिलीप पाटील इंग्रजी माध्यम शाळेचे मुख्याध्यापक निशा पोळेकर, खालापूर तालुक्यातील विस्तार अधिकारी शिल्पा दास, देविदास पाडवी व केंद्र प्रमुख जे. पी.परदेशी, संतोष पाटील, जितेंद्र ठाकूर यांच्यासह शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठी भाषेचे संवर्धन महत्त्वाचे -सुरेश कदम

**चौक : प्रतिनिधी**

मराठी भाषेचे स्थान उच्च शिखरावर असून, तिचे संवर्धन करताना समाजहित आणि समाजाचा एकोपा अबाधित राखणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ प्रवचनकार हभप सुरेश कदम यांनी केले आहे.

कोयना क्षत्रिय मराठा समाज सेवा संघ (रजी) यांच्या कोयना जननी दिनदर्शिका २०२६ चे अनावरण आणि त्या निमित्ताने लिखाण करण्याची सवय अबाधित राखणे आणि मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी अध्यक्ष अरुण साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केलेल्या समाजस्तरीय निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

या वेळी समाजातील ज्येष्ठ मान्यवर यशवंत शिंदे, जगन्नाथ साळुंखे, विनायकराव



मोरे, दिलीप कदम, विजय मोरे, राजेंद्र साळुंखे, जयराम कदम, किशोर मोरे, प्रकाश साळुंखे यांच्यासह समाजातील मान्यवर, विद्यार्थी, स्पर्धक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वहस्ते निबंध स्पर्धा दोन गटात आयोजित करण्यात आली होती. यावेळी दिनदर्शिका सहाय्य करणारे यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

पहिला गट विरेन संतोष कदम (माझ्या आयुष्यात आई वडिलांचे स्थान) समृद्धी समीर शिंदे (माझ्या आयुष्यात आई वडिलांचे स्थान) अर्णव नरेंद्र साळुंखे (माझे गाव आणि संस्कृती) दुसरा गट समृद्धी संदीप मोरे (रूढी परंपरांचे पालन कशासाठी) प्रकाश शांताराम साळुंखे (सामाजिक संस्थांची आवश्यकता काय) सौ.सायली सुशांत कदम (मराठी भाषा, अभिजात भाषा म्हणजे काय) किरण बाबाजी साळुंखे (संगणकाच्या जन्माने झालेले परिणाम) संदेश शरदराव साळुंखे (देशाचे आर्थिक धोरण) या विजेते स्पर्धकांना प्रशस्तीपत्र, सन्मान चिन्ह देण्यात आले, तर ५१ भाग घेतलेल्या स्पर्धकांना प्रशस्तीपत्र पत्र देऊन गौरविण्यात आले.

रायगड, रत्नागिरी, पालघर, ठाणे,सातारा जिल्ह्यातील अनेकांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सचिव मिलिंद मोरे, सूत्र संचालन सूर्यकांत कदम, सुमित कदम, आभार रोहित कदम, कृतिका कदम यांनी महिलांचा सन्मान केला.

# प्रकाश देसाई प्रतिष्ठानचे कार्य कौतुकास्पद

## ॲड. नीलिमा पाटील यांचे गौरवोद्गार; राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे उद्घाटन

**पाली : प्रतिनिधी**

प्रकाश देसाई सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे कार्य प्रेरणादायी व कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष ॲड. नीलिमा पाटील यांनी काढले. त्या पाली येथे आयोजित राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.

भाजप नेते प्रकाश देसाई यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्रतिष्ठानच्या वतीने तेराव्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष गीता पालरेचा यांच्या हस्ते झाले. समारंभास सुएसोच्या संचालिका ज्योत्स्ना देसाई, प्रकाश कारखानीस, प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. दीपक पुरोहित व त्यांचे कुटुंबीय, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी व दिवाणी न्यायाधीश श्रेयस धारप, पालीचे नगराध्यक्ष पराग मेहता, उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर, संचालक आलाप मेहता, श्रीकांत ठोंबरे, आरिफ मणियार, प्रणाली शेठ, संदेश शेवाळे,राजेश




गोळे, ललित ठोंबरे, किरण खंडागळे, सुशील शिंदे यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थिती होते. या वेळी डॉ. शशिकला पुरोहित यांना जीवन गौरव, तर पत्रकार धम्मशील सावंत व रवींद्रनाथ ओव्हाळ यांना समाजरत्न पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

आपल्या भाषणात ॲड. नीलिमा पाटील पुढे म्हणाल्या की, विकासकामांबरोबर समाजाची क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातली भूक भागविण्याच्या दृष्टीने आणि त्यातून सुधागड तालुक्यातील नवोदित कलाकार, खेळाडूंना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी प्रकाश देसाई सामाजिक आणि सांस्कृतिक प्रतिष्ठान गेले बारा वर्षे अविरतपणे कार्यरत आहे. जनहित व समाजासाठी निस्वार्थी, प्रामाणिक भावना जपत काम करण्याची वृत्ती ही देसाई यांच्या व्यक्तिमत्वात सामावली आहे.

गीता पालरेचा यांनी आपल्या शुभेच्छापर मनोगतात सांगितले की, प्रतिष्ठानने आज एवढी वर्ष अतिशय मेहनत घेत डोळ्याचे पारणे फेडणारे खूप छान कार्यक्रम केले. त्यांच्या कार्यक्रमाचे कुठले मोजमाप मला इथे देता येणार नाही, पण कुठलीही अपेक्षा न करता ते जे काम करतायत ते निश्चितपणे वाखाणण्याजोगे आहे.

एकांकिका म्हणजे नेमके काय असते याची पुरेपुर ओळख पालीतील नागरिकांना झाल्यानेच रात्री एकांकिका संपेपर्यंत थंडीत शेवटपर्यंत या एकांकिकांचा मनमुराद आनंद अनुभवत आहेत. त्यामुळेच पालीमध्ये नाट्यशाळा निर्माण झाली व या स्पर्धामध्ये सहभागी होत आहे हे प्रतिष्ठानला अभिमानास्पद असल्याचे प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा प्रकाश देसाई यांनी म्हटले.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष वेत्रवान गुरव म्हणाले की, गेल्या बारा वर्षांमध्ये अनेक प्रकारचे नवे चेहरे, नव्या संहिता, नवा विचार प्रत्येक एकांकिकेमधून आपल्याला मिळत असतो. इथे सादर झालेल्या एकांकिकांमधून अनेक स्पर्धक जे पुढे व्यावसायिक रंगभूमीवर मालिकांमध्ये, चित्रपटांमध्ये भूमिका सादर करताना आपल्याला दिसत असतात. सर्वेश गुरव यांनी, एकांकिकेचा महोत्सव सातत्याने अखंडपणे करत राहणं हीसुद्धा रंगभूमीची आणि कलेची एक प्रकारची तपश्चर्या आहे, असे नमूद केले.

राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेतील नाट्य कलाकारांचा अभिनव पाहण्यासाठी ग.बा. वडेर हायस्कूल पटांगणात नाट्यरसिकांची कडाक्याच्या थंडीतही मोठी गर्दी पहावयास मिळत असून प्रतिष्ठानचे अध्यक्ष वेत्रवान गुरव, उपाध्यक्ष अभिजित चांदोरकर आदी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी झटत आहेत.


### जाहीर नोटीस

ॲड. शिरीष प. लेले
निशाणी क्र.८२/ड
स्पे. मु. नं. ७२/२०२५

**अलिबाग येथील मे. सि. ज. सि. डी. सो. यांचे कोर्टात**

श्री. रविंद्र जयवंत देशपांडे, वगैरे ......वादी
विरूध्द
श्री. मकरंद सुरेश नार्वेकर, वगैरे ......प्रतिवादी

प्रति,
प्र.वादी नं. ३ सुधा रामचंद्र होनगाडू, रा. फ्लॅट क. २०१, ए विंग, इस्ट एंड अपार्टमेंट, प्लॉट क. २६च, महेंद्र ग्लोबल गॅलरीजवळ, सेक्टर ६, कोमोठे पनवेल, जि. रायगड

ज्याअर्थी वादी श्री. रविंद्र जयवंत देशपांडे, उ.व. ६४ वर्षे, धंदा शेती नोकरी, रा. मु. पो. किहिम, ता. अलिबाग, जि. रायगड व रा. २३/अ, सर्वोदय भुवन, एम.एच. ३९, गोखले रोड उत्तर, अपनाबाजार समोर दादर (प) मुंबई ४०००२८, यांनी अलिबाग येथील दिवाणी न्यायाधिश व. स्तर यांचे न्यायालयात स्पे.मु. नं. ७२/२०२५ दाखल केले आहे.

सदर कामातील प्र.वादी नं. ३ ला दिलेल्या पत्त्यावर नोटीस काढली असता, प्र.वादी नं. ३ चे समन्स 'घर कडी कुलुप लावून बंद' असा शेरा मारून न बजावता परत आलेले आहे. वादीच्या माहीतीप्रमाणे वरील नमुद पत्ता हा योग्य व बरोबर असून प्र.वादी त्याच पत्त्यावर राहत असूनही नोटीसीची बजावणी करून घेण्यास जाणिवपुर्वक टाळाटाळ करीत आहेत असे निष्पन्न झाले आहे. तसेच वादीच्या माहितीप्रमाणे हा तुमचा शेवटचा माहीत असलेला पत्ता आहे. त्यामुळे तुम्हास या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येत आहे की,

सदर रे. मु. नं. ७२/२०२५ या कामाची पुढील ता. १२/०१/२०२६ अशी नेमण्यात आली आहे. त्या दिवशी तुम्ही स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत ठिक स. १०:०० वा. कोर्टात हजर राहून सदर दाव्याचेकामी तुमचा बचाव सादर करावा. उक्त दिनी तुम्ही स्वतः अगर वकीलांमार्फत हजर होवून तुमचा बचाव सादर न केल्यास सदर दरखास्तीचेकामी तुमच्या विरूध्द एकतर्फा हुकूम पारित करण्यांत येईल व सदर दरखास्तीचेकामी पुढील हुकूम मे. कोर्टामार्फत करण्यात येईल हे तुम्हांस कळावे.

सदरची नोटीस आज दि. १९/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/- लिपिक दिवाणी न्यायाधिश अलिबाग -रायगड** | कोर्टाचा शिक्का | **सही/- अधिक्षक दिवाणी न्यायाधिश अलिबाग -रायगड**

# पनवेल मनपाची निवडणूक तयारी

## विविध विभागांसोबत आढावा बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेकडून जोरदार तयारी सुरू असून पोलीस प्रशासन तसेच शासनाच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक पार पडली. या वेळी निवडणूक अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या.

आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याच्या दृष्टीने कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी या वेळी बैठकीत चर्चा झाली. रोख रक्कम, दारू तसेच अमली पदार्थ याच्या वापरावर निर्बंध घालण्यासाठी चेकपोस्ट ची उभारणी, भरारी पथके, व्हिडीओ पथकांचा प्रभावी वापर इत्यादी बाबींवर चर्चा झाली. या वेळी मुंबई झोन ३ चे उपायुक्त दिपक मोहिते आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही चर्चा झाली.






### एक खिडकी योजना राबवणार

निवडणुकीसंबंधातील विविध प्रकारच्या व्यवस्थांमध्ये समन्वयासाठी तसेच सर्व प्रकारच्या सुविधा व परवानग्या तात्काळ पुरविण्यात याव्यात यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांच्या स्तरावर व्यवस्था करण्यात आली असून एकल खिडकी योजना राबविण्यात येणार आहे, अशी माहिती निवडणूक अधिकारी तथा आयुक्तांनी दिली. या बैठकीस निवडणूक अधिकारी तथा आयुक्त पनवेल महानगरपालिका, निवडणूक विभाग उपायुक्त, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणुकीशी संबंधित पालिका व शासनाचे अन्य अधिकारी उपस्थित होते.

**निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांच्या स्तरावर सर्व प्रकारची यंत्रणा सज्ज असून सर्व शासकीय विभागांनी उत्तम समन्वय राखून सहकार्याने काम करावे.**
**-मंगेश चितळे, निवडणूक अधिकारी तथा आयुक्त पनवेल मनपा**

महावितरणच्या अधिकाऱ्यांना यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांसोबत समन्वयाने विद्युत व्यवस्थेचे आयोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सर्व मतदान केंद्रांच्या आजूबाजूला विद्युत व्यवस्था चोख ठेवण्याच्या दृष्टीने या वेळी चर्चा करण्यात आली.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना निवडणुकीच्या अनुषंगाने व्यवस्था राबविण्याबाबत चर्चा करताना आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता देण्याविषयी खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या. कोणतेही नवीन बांधकाम किंवा उदघाटन कार्यक्रम राबविला जाणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

बँक तसेच वित्तीय संस्थांच्या प्रतिनिधींशी चर्चा करताना रोख रकमेचे आरहन व नियंत्रण, खात्यांचे व्यवस्थापन याबाबतच्या निवडणूक काळात देण्यात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे काळजीपूर्वक पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. संशयास्पद व्यवहारांबाबत दक्ष राहण्याबाबत यावेळी सांगण्यात आले.

# रसायनी पोलीस ठाण्यात सुसज्ज बैठक हॉलचे उद्घाटन

**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

अल्काईल अमाइन्स केमिकल्स तर्फे सीएसआर निधीमार्फत रसायनी पोलीस ठाण्यात सुसज्ज कॉन्फरन्स हॉल बांधून देण्यात आला, त्याचे उद्घाटन रायगड पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या हस्ते करण्यात आले. असा सुसज्ज हॉल उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी अल्काईल अमाइन्सचे आभार मानले. या वेळी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यातील अधिकारी उपस्थित होते. त्यांचाही सत्कार आँचल दलाल यांच्या हस्ते करण्यात आला.



रसायनी पोलीस ठाण्यात सणवारांना व कायदा सुव्यवस्थेकरीता होणाऱ्या बैठकांना सुसज्ज बैठक हॉल असावा अशी मागणी असताना अल्काईल अमाइन्स केमिकल्सतर्फे सीएसआर निधीमार्फत रसायनी पोलीस ठाण्यात सुसज्ज बैठक हॉल बांधून देण्यात आला, त्याचे उद्घाटन रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्याहस्ते करण्यात आले. असा या वेळी उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.विशाल नेहुल, प्रिया असोसिएशनचे अध्यक्ष सुनिल कदम, अल्कली अमाईन्सचे मॅनेजर नागनाथ खकाळे, युनिट एच आर अर्चना माने आदी उपस्थित होते. या वेळी जिल्हा पोलिस अधिक्षक आँचल दलाल यांनी पोलिस ठाण्याला सुसज्ज हॉल उपलब्ध करून दिल्याबद्दल अल्काईल अमाइन्सचे आभार मानले. या वेळी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील अल्कलीचे ओंकार, रेन्हिवास कंपनीचे निलेश साळुंखे, पेट्रोनासचे संतोष घोले, नोव्हेझॉनचे मिनल गडगे आदींसह इतर कंपनी अधिकारी पोलीस पाटील, पत्रकार उपस्थित होते.

खालापूर उपअधीक्षक डॉ विशाल मेहुल यांनी या उपक्रमाचे कौतुक करून रसायनी पोलीस स्टेशनला शुभेच्छा दिल्या. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी परिसरातील परिस्थितीचा थोडक्यात आढावा दिला आणि पोलीस दल सशक्तपणे आपली भूमिका सहकार्याने चोख बजावत आहे याची माहिती दिली. अल्काईल अमाइन्सतर्फे वर्क्स मॅनेजर नागनाथ खकाळे आणि युनिट एच आर अर्चना माने यांनीही अल्काईल अमाइन्सला या उपक्रमाचा भाग होता आले. याबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव यांनी मानले.

# वाजेकर विद्यालयात मोफत नेत्र तपासणी



**उरण : वार्ताहर**

फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी (दि.२०) उलवे येथील इनोव्हिजन आय हॉस्पिटल अँड लेसर सेंटर यांच्या मार्फत उच्च माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिर विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

या शिबिरात इनोव्हिजन आय हॉस्पिटल अँड लेसर सेंटरच्या डॉ. तनुजा भाकरे व डॉ. सुयोग वारोसे यांनी विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी केली. तसेच मोबाईलचा अति वापर केल्यामुळे होणारे दुष्परिणाम व डोळ्यांच्या आरोग्याची काळजी याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिराचे यशस्वी नियोजन उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, दि. रयत सेवक को-ऑप. बँकेचे संचालक प्रा. किशोर पाटील, विभागप्रमुख प्रा. बाबूलाल पाटोळे, सायन्स विभाग प्रमुख प्रा.झुंझार माने, कॉमर्स विभाग प्रमुख ऋषिकेश धुरी,प्रा. केशव पवार, प्रा.मितेश मेतकर, प्रा.गणेश ताकड, कार्यालयीन प्रमुख नितीन म्हात्रे, नवनीत ठाकूर, प्रतिक वर्तक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने करण्यात आले. या वेळी बहुसंख्य विद्यार्थ्यांनी शिबिराचा लाभ घेतला.

# रायगड विभागीय गायन स्पर्धेत गव्हाण विद्यालय पुन्हा अव्वल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत दरवर्षी होणाऱ्या रायगड विभागीय गायन स्पर्धेत संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज यंदा पुन्हा एकदा अव्वल ठरले. गव्हाण शाखेतील याज्ञिक साईनाथ मोकल याने 'सुरत पिया के फिर बिसराई' या शास्त्रीय गीत गायनाने सर्वांनाच मंत्रमुग्ध केले.



अगदी परीक्षकांनासुद्धा निशब्द केले. त्याच्या या सादरीकरणाने गट क्रमांक दोन मध्ये त्याने प्रथम क्रमांक पटकावला. तर याच गटात यज्ञ हृदयनाथ मोकल याने उत्तेजनार्थ क्रमांक मिळविला. या दोघांनीही गव्हाण शाखेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या स्पर्धेत श्राव्या समीर घरत, यज्ञ हृदयनाथ मोकल,याज्ञीक साईनाथ मोकल या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विभागीय गायन स्पर्धा बुधवार १७ डिसेंबर २०२५ रोजी पळस्पे येथील छत्रपती शिवाजी विद्यालय या शाखेत संपन्न झाल्या. सदर स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी रायगड विभागीय अधिकारी मोहनराव कोंगेरे होते.

या वेळी पळस्पे शाखेचे चेअरमन रवींद्रशेठ चोरगे, मोहन गवंडी संगीता केळकर, दमयंती भगत, रघुनाथ गवंडी आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. पळस्पे विद्यालयाचे मुख्याध्यापक चिखलेकर,विभागीय कार्यालयाचे संतोष गुजर आणि सर्व शिक्षक बंधू भगिनी यांनी या कार्यक्रमाचे सुंदर आयोजन केले. या वेळी रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागातील सर्व शाखांनी सहभाग नोंदवला.

पारितोषिक वितरण समारंभात विजयी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. गव्हाण विद्यालयाच्या प्राचार्या रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेजचे विभागपमुख संजय उगले आणि सर्व शिक्षक वृंदाने यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# पिल्लई कॅम्पसमध्ये मेकरथॉन

**पनवेल : वार्ताहर**

पिल्लई विद्यापीठाने-अभियांत्रिकी, वास्तुकला, वाणिज्य, डिझाइन आणि व्यवस्थापन यांचा समावेश असलेल्या मेकरथॉन ७.० - विचार करा, शिका, तयार करा या प्रमुख नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई कॅम्पसमध्ये यशस्वी आयोजन केले होते.




मेक इन इंडियाच्या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी सुसंगत असलेल्या या कार्यक्रमात ठाणे, कल्याण, पनवेल, नवी मुंबई आणि मुंबई येथील संस्थांमधील मार्गदर्शक शिक्षकांनी पाठिंबा देऊन १८९ आंतरशालेय आणि आंतरमहाविद्यालयीन संघांचे १००० हून अधिक विद्यार्थी एकत्र आले.

या वेळी अध्यक्ष डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई यांच्या हस्ते २ लाख रुपयांचे रोख पारितोषिक, ट्रॉफी आणि प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. यात विज्ञान आणि तंत्रज्ञान (शाळा) - प्रथम पारितोषिक: सरस्वती माध्यमिक विद्यालय (मराठी), ठाणे, द्वितीय पारितोषिक: सेंट थॉमस अकादमी ऑफ एज्युकेशन, विचुंबे, नवीन पनवेल, तृतीय पारितोषिक: डॉ. पिल्लई ग्लोबल अकादमी, नवीन पनवेल. विज्ञान आणि तंत्रज्ञान (कनिष्ठ महाविद्यालये) - प्रथम पारितोषिक: सी. के. टी. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल, द्वितीय पारितोषिक: एम्पायरियन स्कूल, खारघर, तृतीय पारितोषिक: सेंट जोसेफ हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज, कळंबोली. डिझाइन - आर्किटेक्चर आणि इंजिनिअरिंग (शाळा) - प्रथम पारितोषिक: जयपुरियार स्कूल, सानपाडा, दुसरे पारितोषिक: अपीजे स्कूल, नेरुळ, तिसरे पारितोषिक: सेंट लॉरेन्स हायस्कूल, वाशी. डिझाइन - आर्किटेक्चर आणि इंजिनिअरिंग (कनिष्ठ महाविद्यालये) - प्रथम पारितोषिक: न्यू होरायझन पब्लिक स्कूल, न्यू पनवेल, द्वितीय पारितोषिक: सी. के. टी. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय, पनवेल, तृतीय पारितोषिक: सेंट मेरीज ज्युनियर कॉलेज, वाशी. बिझाथॉन (ज्युनियर कॉलेजेस)- प्रथम पारितोषिक: न्यू होरायझन पब्लिक स्कूल, न्यू पनवेल, दुसरे पारितोषिक: डॉ. पिल्लई ग्लोबल अकादमी, न्यू पनवेल, तिसरे पारितोषिक: बाल भारती पब्लिक स्कूल, खारघर, नवी मुंबई.

मेकरथॉन ७.० ने अनुभवात्मक शिक्षणाद्वारे नावीन्यपूर्णता, सहकार्य आणि उद्योगासाठी तयार कौशल्ये जोपासण्याच्या पिल्लई विद्यापीठाच्या वचनबद्धतेची पुष्टी केली. मेकरथॉन ७.० ने तांत्रिक नवोपक्रम आणि अनुभवात्मक शिक्षणासाठी एक जीवंत, समोरासमोरचा व्यासपीठ प्रदान केले.

# ज्येष्ठ नागरिक संस्थेतर्फे सभासदांसाठी सहल



**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर येथील दिवाळे कोळीवाड्यातील ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही संस्थेच्या सभासदांसाठी चार दिवसांच्या धार्मिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. ही सहल शनिवार २० ते मंगळवार २३ डिसेंबर या कालावधीत पार पडली. या धार्मिक सहलीदरम्यान पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, गाणगापूर तसेच कार्ला गड येथील आई एकविरा देवी या पवित्र तीर्थक्षेत्रांना भेट देण्यात आली. या सहलीसाठी संस्थेचे एकूण ४९ जेष्ठ नागरिक सदस्य सहभागी झाले होते.

सकाळी ७ वाजता सर्व जेष्ठ नागरिक व त्यांचे कुटुंबीय विरंगुळा केंद्राजवळ एकत्र जमले होते. भक्तिमय वातावरणात सहलीस प्रारंभ झाला. हरीनामाचा गजर, पारंपरिक भजने व नामस्मरणाच्या तालावर संपूर्ण प्रवास भक्तीरसात रंगून गेला.

दरम्यान, या संस्थेत १४० हून अधिक सभासद असून, प्रत्येक सामाजिक कार्यात मोठ्या उत्साहाने सहभागी असतात. समाजातील ज्येष्ठ व्यक्तींनी जीवनात आनंदी राहण्यासाठी आपल्या जीवनशैलीत बदल करून त्यास अध्यात्माची जोड देत गेल्यावर्षी मुख्यमंत्री 'तीर्थदर्शन' योजने अंतर्गत निवड झालेल्या नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील १२१ लाभार्थी ज्येष्ठ नागरिकांनी अयोध्या तीर्थयात्रेचा लाभ घेतला होता.

या सहलीमुळे जेष्ठ नागरिकांना आध्यात्मिक समाधानासोबतच मानसिक आनंद, आपुलकी, स्नेहभाव व उत्साह मिळाल्याचे सहभागी सदस्यांनी सांगितले. तसेच अशा उपक्रमांमुळे जेष्ठ नागरिकांमध्ये सामाजिक संवाद व सकारात्मक ऊर्जा मिळत असल्याने त्यांच्या आरोग्य व मनः स्वास्थ्याला सकारात्मक चालना मिळत असल्याचे दिवाळे जेष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत कोळी यांनी सांगितले.

# तळोजा परिसरातील बिबट्याचा व्हिडीओ फेक; वन विभागाची स्पष्टोक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा जेल परिसरातील खुटुक बांधण गावाजवळ बिबट्या असल्याचा एक व्हिडीओ पहाटेपासून सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या व्हिडीओमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, स्थानिक गावकऱ्यांनी याबाबत तत्काळ खारघर पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच गावकरी, खारघर पोलीस तसेच वन विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. या वेळी व्हिडीओ व घटनास्थळाची सखोल पाहणी करण्यात आली. पाहणीनंतर वन विभाग अधिकाऱ्यांना संबंधित व्हिडिओ फेक



असल्याचे निदर्शनास आले. प्रत्यक्ष घटनास्थळी बिबट्याचा कोणताही वावर अथवा ठसे आढळून आले नाहीत. त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण काही अंशी निवळले आहे.

या वेळी वन परिक्षेत्र अधिकारी गजानन पानपट्टे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या अशा फेक व्हिडिओंवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये. कुठेही संशयास्पद प्राणी दिसल्यास तत्काळ वन विभागाला माहिती द्यावी, अफवा पसरवू नयेत. वन विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून अफवांमुळे घबराट न पसरवता प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# विज्ञान प्रदर्शनामध्ये युईएस स्कूलचे यश

**उरण : वार्ताहर**

पंचायत समितीने १५ ते १७ डिसेंबर ह्या कालावधी मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील विदयालय, पिरकोन येथे उरण तालुका विज्ञान प्रदर्शन २०२५-२६ तसेच विविध स्पर्धा जसे की निबंध, वक्तृत्व आणि प्रश्नमंजुषा आयोजन केले होते. ह्या स्पर्धामध्ये एकूण २५ (अंदाजे) शाळा व कॉलेजने सहभाग घेतला होता. ज्यात यु. ई. एस. स्कूल व ज्यु. कॉलेजने एकूण ६ बक्षिसे मिळवून घवघवीत यश प्राप्त केले आहे.

यात ज्यु. कॉलेज प्रकल्प - प्रथम क्रमांक २. शिक्षक प्रकल्प - प्रथम क्रमांक३. वक्तृत्व स्पर्धा (ज्यु. कॉलेज) - प्रथम क्रमांक ४. निबंध स्पर्धा (माध्यमिक विभाग) - द्वितीय क्रमांक ५. प्रश्नमंजुषा स्पर्धा (ज्यु. कॉलेज) - द्वितीय क्रमांक ६. प्रश्नमंजुषा स्पर्धा (माध्यमिक विभाग) - तृतीय क्रमांकविकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी एसटीइएम ह्या विषयावर ज्यु. कॉलेजमधील भार्गवी मंदार जाधव आणि एकूण १५ विद्यार्थीनी तर उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि हरित उर्जा ह्याविषयांवर माध्यमिक विभागामधील साईराज सुरेश हरीमकर आणि एकूण नऊ विद्यार्थीनी प्रकल्प तयार करुन प्रदर्शनात सहभाग घेतला होता.

विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी तर यश मिळवलेच पण शिक्षकांच्या प्रकल्पानेही प्रथम क्रमांक मिळविला. ह्या प्रकल्पासाठी मार्गदर्शन करणारे ज्यु. कॉलेजचे प्रतिक प्रशांत पाटील व केतकी चंद्रविलास ठाकूर तर माध्यमिक विभागाच्या स्मिता अनिल पुजारी व वैशाली मनोहर मेश्राम ह्यांचे व सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे युईएस संस्थेचे कमिटी मेंबर्स व स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या व समन्वयक, माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका ह्यांच्याकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# फुंडे येथे संत गाडगे महाराज स्मृतिदिन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत विद्यालयाचे प्राचार्य बी. बी. साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली थोर समाजसुधारक संत गाडगे महाराज यांचा ६९वा स्मृतिदिन झाला.

विद्यालयाच्या उपप्राचार्या एस. डी. थोरात, पर्यवेक्षिका एस. एम. बाबर, एस. एस. पाटील व उपस्थित सर्व सेवक वृंदाच्या हस्ते क्रांतिकारी संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. श्रेया शिंदे, आर्या शिर्के, स्नेहल केदार, व पायल यांनी गाडगे बाबांचे जीवन कार्य विषद केले. त्यानंतर इयत्ता सातवी अ च्या विद्यार्थीनी नव्या म्हात्रे, रुद्रा धुमाळ व सहकारी यांनी स्वच्छतेवर आधारित 'स्वच्छ भारत सुंदर भारत'या नाटिकेचे सुंदर सादरीकरण केले.

विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक आर. जी. शेळके व पर्यवेक्षिका एस. एम. बाबर यांनी आधुनिक संत व थोर समाजसुधारक संत गाडगे महाराज यांचे जीवन कार्य सांगितले.

विदयार्थ्यांनी शालेय परिसराची स्वच्छता केली. सदर कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले ते संत गाडगे बाबांची वेशभूषा केलेले दोन विद्यार्थी स्वराज पवार व श्रवण गोरे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. एन. पाटील यांनी केले. कार्यक्रमास विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, शाळा व्यवस्थापन समिती च्या अध्यक्षा अपेक्षा पवार तसेच सर्व सेवकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



# श्रीवर्धनचा नवा नगराध्यक्ष आज ठरणार

## निवडणूक निकालाकडे जनतेचे लक्ष; मतमोजणीतून स्पष्ट होणार चित्र

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



श्रीवर्धन नगर परिषदेच्या निवडणुकीची निर्णायक घडी आली असून, १२,६३७ मतदारांनी दिलेल्या मतदानाचा निकाल रविवारी (दि. २१) सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणाऱ्या मतमोजणीअंती स्पष्ट होणार आहे. दोन फेऱ्यांत होणाऱ्या मतमोजणीनंतर अंतिम निकाल जाहीर केला जाणार आहे.

या निवडणुकीकडे केवळ श्रीवर्धनच नव्हे, तर संपूर्ण रायगड जिल्ह्यासह राज्यातील राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे. विशेषतः नगराध्यक्षपदाची लढत ही या निवडणुकीचे केंद्रबिंदू ठरली आहे. एकूण मतदानात ६,२३० महिला आणि ६,४०७ पुरुष मतदारांनी सहभाग नोंदवला. मतदारांनी मोठ्या प्रमाणावर मतदान करत लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास अधोरेखित केला, असे चित्र दिसून आले.

नगराध्यक्षपदासाठी चार उमेदवार रिंगणात असले तरी राजकीय चर्चांमध्ये खरी लढत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जितेंद्र सातनाक आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे अतुल चोगुले यांच्यात होत असल्याचे मत अनेकांकडून व्यक्त केले जात आहे.

गेल्या काही वर्षांत श्रीवर्धन नगर परिषद राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली कार्यरत होती. या कालावधीत पाणीपुरवठा सुधारणा, रस्ते विकास, सागरी पर्यटनाशी संबंधित कामे, समुद्रकिनारा सुशोभीकरण, आरोग्य सुविधा आणि प्रशासकीय इमारतींचा विकास अशी विविध कामे झाली असल्याचा उल्लेख नागरिकांकडून केला जात आहे, मात्र तरीही यंदाची निवडणूक अत्यंत चुरशीची का ठरली, हा प्रश्न चर्चेचा विषय ठरत आहे. चहाच्या टपऱ्यांपासून बाजारपेठेपर्यंत, सत्ता कायम राहणार की बदल घडणार? यावर चर्चा रंगताना दिसत आहे.

मागील निवडणुकीत अल्प मतांनी पराभूत झालेले अतुल चोगुले यावेळी पुन्हा जोरदार प्रयत्न करताना दिसले, तर दुसरीकडे जितेंद्र सातनाक यांना पक्षसंघटना आणि स्थानिक पातळीवरील पाठबळ मिळाल्याचे चित्र आहे. प्रचाराच्या शेवटच्या क्षणापर्यंत दोन्ही बाजूंनी नियोजनबद्ध पद्धतीने प्रयत्न करण्यात आले.

सध्या शहरातील विविध चौक, नाके आणि सार्वजनिक ठिकाणी वेगवेगळे तर्कवितर्क, अंदाज आणि राजकीय गणिते मांडली जात आहेत. काहींच्या मते नगरसेवक बहुमत एका पक्षाला मिळू शकते, तर नगराध्यक्षपद वेगळ्या पक्षाकडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशीही चर्चा ऐकायला मिळत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकदा आपली सत्ता कायम ठेवते का? की शिवसेना उद्धव ठाकरे गट श्रीवर्धन नगरपरिषदेत नवा राजकीय अध्याय सुरू करते? हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

सध्या सर्व उमेदवार, कार्यकर्ते आणि नागरिकांची नजर एका क्षणावर स्थिरावली आहे. मतदान यंत्रात बंद झालेले भवितव्य काही तासांत उघड होणार असून श्रीवर्धनचा पुढील पाच वर्षांचा कारभार कोणाच्या हातात जाणार, हे रविवारी निश्चित होणार आहे.

# रोहा अष्टमी नगर परिषद निवडणुकीची आज मतमोजणी, प्रशासनाकडून तयारी

**रोहा : प्रतिनिधी**



रोहा अष्टमी नगर परिषद निवडणुकीच्या निकालाची साऱ्यांनाच उत्सुकता लागली आहे. २१ डिसेंबर रोजी शहरातील ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे मतमोजणी होणार असून यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली आहे.

रोहा अष्टमी नगरपरिषदेचे मतदान प्रक्रिया २ डिसेंबर रोजी पूर्ण झाल्यानंतर थेट नगराध्यक्षपदाचे दोन उमेदवार व १९ जागांसाठी ५० उमेदवारांचे भवितव्य यंत्रपेटीत बंदिस्त झाले होते. मतदानात प्रक्रियेत रोहा अष्टमी नगर परिषदेसाठी ७१.९२ टक्के मतदान झाले आहे. नगरपरिषद हद्दीतील १२७०८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजवला.

नवडणुकीसाठी उभे असलेले उमेदवार एकूण ५२ लोकांचे राजकीय भविष्य मतपेटीतून बाहेर येणार आहे. कोण बाजी मारणार याकडे साऱ्या रोहेकरांचे लक्ष लागले आहे. २ तारखेपासून २१ तारखेच्या सकाळपर्यंत होत असलेल्या तर्क–वितर्कांना पूर्णविराम मिळणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राजेंद्र जैन हे नगरसेवकपदासाठी बिनविरोध आल्यानंतर उर्वरित झालेल्या निवडणुकीत मतमोजणी अंती नगराध्यक्षपदाचे दोन, सदस्यपदाचे १९ जागेसाठी ५० उमेदवारांचे भवितव्य ठरणार आहे. त्यामुळे नगराध्यक्षपद व सदस्यपदांची विजयी माळ कोणाच्या गळ्यात पडणार हे दुपारपर्यंत कळणार आहे.

या निवडणुकीत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या बालेकिल्ल्यात शिवसेनेने आव्हान दिले होते. ते आव्हान कितपत विजयात उतरणार हे निकालाअंती कळणार आहे. रोहा अष्टमी नगर परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादीविरोधात शिवसेना शिंदे गट, शिवसेना उबाठा आणि भारतीय जनता पार्टी ताकतीने उतरली होती. यामध्ये काही जागांसाठी लढत अपवाद होती, तर दुसरीकडे काँग्रेस मात्र स्वतंत्रपणे निवडणुकीत उतरली होती. त्यामुळे या निवडणुकीत कोण विजयी होणार व कोण पराभूत होणार याकडे लक्ष लागले आहे.

# गाणी–कोंढे येथे महिलांसाठी अगरबत्ती निर्मिती प्रशिक्षण



*✻ प्रशिक्षणानंतर महिलांमध्ये नव्या उद्योगाबाबत आत्मविश्वास आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, स्वरोजगाराच्या दिशेने सकारात्मक पावले पडताना दिसत आहेत.*

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने श्रीवर्धन तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत गाणी–कोंढे येथे महिलांसाठी अगरबत्ती निर्मिती प्रशिक्षण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. हे प्रशिक्षण मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत राबविण्यात आले आहे.

या प्रशिक्षण शिबिरात महिलांना अगरबत्ती निर्मितीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक, तसेच त्यामागील तांत्रिक व व्यावसायिक बाबींचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले. घरच्या घरी कमी भांडवलात उद्योग कसा सुरू करता येईल, याची सविस्तर माहिती देत महिलांना आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करण्यास प्रोत्साहित करण्यात आले.

तज्ज्ञ प्रशिक्षक शिल्पा पाटील आणि विप्राली पुसाळकर यांनी अगरबत्ती तयार करण्याची प्रक्रिया सोप्या भाषेत समजावून सांगितली. कच्चा माल निवड, सुगंधी द्रव्यांचे योग्य प्रमाण, दर्जेदार उत्पादन, आकर्षक पॅकिंग आणि तयार मालाची विक्री व बाजारपेठेपर्यंत पोहोच कशी करावी, याबाबत महिलांना उपयुक्त मार्गदर्शन देण्यात आले.

उपक्रमास ग्रुप ग्रामपंचायत गाणी–कोंढेचे सरपंच आदित्य कासरुंग, ग्रामपंचायत अधिकारी अभिजित माने, कृषी विस्ताराधिकारी राधा कराळे, उमेदचे तालुका व्यवस्थापक किशोर गोरटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# ट्रकची तीन वाहनांना धडक, चालक जखमी

**खालापूर :** मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर बोरघाटातील अंडा पॉईंटजवळ एका ट्रकचालकाचे नियंत्रण सुटले आणि समोर जाणाऱ्या दोन टेम्पो व अज्ञात वाहनांना धडक दिली व बाजूला असलेल्या लोखंडी खांबाला धडकला. या अपघात ट्रकचालक प्रफुल्ल मोहन शिंदे (वय ३०, रा. पवई, मुंबई) केबिनमध्ये अडकला. त्याला बाहेर काढून एमजीएम रुग्णालय कळंबोली येथे दाखल करण्यात आले आहे.



# महागाव प्राथमिक आरोग्य केंद्राला औषध पुरवठा

**तळा : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत महागाव यांच्याकडून प्राथमिक आरोग्य केंद्र महागावला औषध साठा पुरवठा करण्यात आला.

प्राथमिक आरोग्य केंद्र महागाने ग्रामपंचायतीकडे औषध पुरवठा करण्याची मागणी केली. रूग्णांची संख्या जास्त असल्याने औषध पुरवठा कमी पडत होता.

ग्रामसभेमध्ये विस्तार अधिकारी (ग्रा. पं.) तथा प्रशासक पुष्पा नेरकर, ग्रामपंचायत अधिकारी सुवर्णा तांबडे, सुषमा कसबले माजी सरपंच तसेच माजी सदस्य, पोलीस पाटील, ग्रामस्थ संतोष आमले, कमलाकर मांगले, कृष्णकांत मानकर, गंगाराम साळवी व महिला मंडळ यांच्या हस्ते औषधे डॉक्टरांकडे सुपूर्द करण्यात आली. प्राथमिक केंद्राचे अधिकारी कुणाल मनवर यांनी ग्रामपंचायतीचे आभार व्यक्त केले.

# पोतराज, गोंधळी, नंदीबैल कोकणात दाखल



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भात कापणीचा हंगाम सरला की, घाटमाथ्यावरून कोकणात पोतराज, गोंधळी, तसेच नंदीबैलवाले येत असतात. नंदीबैल हे शंकराचे वाहन असून ते पूजनीय मानले जाते. नंदीबैल घेऊन जे दारोदारी खेळ दाखवतात, त्यांना नंदीबैलवाला असे म्हणतात. या नंदीला पायात घुंगरू, गळ्यात घंटा अन् टोकदार शिंगे अशा प्रकारे सजविले जाते. हा आकर्षक व धष्टपुष्ट प्राणी घेऊन नंदीबैलवाला भटका समाज गावोगांवी व दारोदारी फिरत असतो. यावरच त्याचा उदरनिर्वाह चालतो. हे नंदीबैलवाले रसायनी परिसरात दाखल झाले आहेत.

थंडीचा हंगाम सुरू झाला की, घाटमाथ्यावरील भटका विमुक्त समाज आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी कोकणात दाखल होत असतो. हवेत गारवा निर्माण होऊन थंडी पडताच मोहोपाडा रसायनी पाताळगंगा परिसरात गुबुगुबुचा आवाज कानी ऐकू येऊ लागला आहे.

ग्रामीण भागात विविध ठिकाणी पोतराज, गोंधळी, नंदीबैल येत आहे. नंदीबैल आणणारे याच व्यवसायावर उदरनिर्वाह करीत असतात. पिढ्यानपिढ्यापासून करीत असलेल्या व्यवसायात खंड पडू नये यासाठी हा वर्ग कोकणात येत असतो. या नंदीबैलांना पाहण्यासाठी लहानथोर, महिला गर्दी करून गाऱ्हाणे मांडतात. यातच प्रश्नाचे योग्य उत्तर मिळाल्याने महिला वर्गांसह नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण दिसून येते.

या नंदीबैलाला विविध आभूषणांनी सजविलेले असते. शिंगे टोकदार असतात, त्यांना रंगविलेले असते, पायात घुंगरू, पाठीवर शाल असते. या आकर्षक नंदीबैलाकडे लहान–मोठे आकर्षित होतात, महिला वर्गामध्ये नंदीबैल पाहून उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र दिसून येते. शिवाय आपल्या जवळ असलेले धान्य, कपडे, पैसे देऊन त्यांचा आशीर्वाद घेताना महिला दिसतात.

# माणगाव येथील द.ग. तटकरे महाविद्यालयात राज्यस्तरीय प्राध्यापक विकास कार्यक्रम उत्साहात

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**




रायगड येथील माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित द. ग. तटकरे महाविद्यालयाच्या व्यवस्थापन अभ्यास विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने, महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी, पुणे यांच्या सहकार्याने व पीएम–उषा प्रायोजित व्यवस्थापन अभ्यासात बौद्धिक संपदा हक्क या विषयावरील राज्यस्तरीय एकदिवसीय प्राध्यापक विकास कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी डॉ. आबासाहेब पाटणकर अध्यक्षस्थानी होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. गुरुराज डांगरे (प्रमुख, व्यवस्थापन विभाग, स्टार्ट–अप, इनक्युबेशन व इनोव्हेशन, प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, चिंचवड, पुणे), प्रा. उन्मेषा पाटील (संचालक, नवोपक्रम, बौद्धिक संपदा हक्क व उद्योजकता, विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे) आणि प्रतिक धमाल (व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी, पुणे) उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची उद्दिष्टे व महत्त्व विशद केले. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात प्रा. गुरुराज डांगरे यांनी बौद्धिक संपदा हक्कांचे स्वरूप, त्याचे महत्त्व व व्यवस्थापन शिक्षणातील प्रत्यक्ष उपयोग यावर सखोल मार्गदर्शन केले.दुसऱ्या सत्रात प्रा. उन्मेषा पाटील यांनी नवोपक्रम, पेटंट प्रक्रिया आणि उद्योजकतेमध्ये बौद्धिक संपदा हक्कांची निर्णायक भूमिका स्पष्ट करत सहभागी प्राध्यापकांना मार्गदर्शन केले.

समारोप सत्रात सहभागी प्राध्यापकांनी कार्यक्रमाबाबत समाधानकारक व सकारात्मक अभिप्राय व्यक्त केला. उपस्थितांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. तेहसिन राऊत व प्रा. अश्विनी शेलार यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. जे.आर. पांडेय यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य आर.एम. आचार्य, व्यवस्थापन अभ्यास विभाग प्रमुख प्रा. आयेशा बडे, प्रा. सुष्मिता म्हामुणकर, प्रा. मंजिरी सावंत, प्रा. शाश्वती महाडीक आणि महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.



**मुरूड : येथील खोरा बंदरात जंजिरा किल्ल्यासाठी जलवाहतूक सुरू झाली आहे. नवीन जेट्टीचा परिसर सायंकाळी सूर्यास्तावेळी खुलून दिसतो.** (छाया : सुधीर नाझरे)

# आमदार प्रवीण दरेकर यांच्या निधीतून करंजखोलसाठी कचरा संकलन गाडी

**महाड : प्रतिनिधी**

भाजपचे विधान परिषद सदस्य तथा राज्य गृहनिर्माण स्वयं समूह पुनर्विकास प्राधिकरण अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांच्या स्थानिक विकास निधीतून महाड तालुक्यातील करंजखोल ग्रामपंचायतीसाठी आधुनिक कचरा संकलन घंटागाडी उपलब्ध करून देण्यात आली आहे. एका कार्यक्रमातून घंटागाडी ग्रामपंचायत प्रशासनाच्या सुपूर्द करण्यात आली.

या कार्यक्रमास भाजप राज्य परिषद सदस्य बिपीन म्हामुणकर, गटविकास अधिकारी उदयसिंह साळुंखे, सरपंच सुनिता महाडीक, उपसरपंच दिव्या उंडरे, उत्तर मंडळ अध्यक्ष निलेश देवगिरकर, दक्षिण मंडळ अध्यक्ष निलेश तळवटकर, प्रसिद्धी संयोजक महेश शिंदे, युवा मोर्चा अध्यक्ष प्रवीण महाडीक, ग्रामपंचायत सदस्य विनोद डिघे, वाहतूक सेल अध्यक्ष नाना पोरे, चंद्रजित पालांडे, गोंडाळे सरपंच आशिष खताते, शहर अध्यक्ष अप्पा सोंडकर, योगेश ताबडे, शिवाजी दरेकर, विकास दरेकर यांच्यासह आजी माजी ग्रामपंचायत सदस्य, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

मागील कालावधीदरम्यान आमदार प्रवीण दरेकर यांनी करंजखोल परिसरास भेट दिली असता किल्ले रायगडकडे जाणाऱ्या प्रवेशद्वाराजवळील परिसरात साचलेला कचरा त्यांच्या निदर्शनास आला. कचरा निर्मूलनासाठी यंत्रणा अपुरी असल्याचे लक्षात आले होते.



# टीम इंडिया 'किवीं'शी भिडणार

## ■ टी-२० वर्ल्डकपआधी न्यूझीलंडविरुद्ध रंगीत तालीम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघ न्यूझीलंडविरुद्ध टी-२० मालिका खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. ही मालिका म्हणजे भारतीय संघासाठी टी-२० वर्ल्डकप आधीची रंगीत तालीम असणार आहे, कारण या मोठ्या स्पर्धेआधी ही भारतीय संघाची शेवटची टी-२० मालिका असणार आहे. बीसीसीआयने या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केली आहे. आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धा आणि न्यूझीलंडविरूद्धच्या टी-२० मालिकेसाठी एकच संघ निवडण्यात आला आहे.

भारत आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये पाच टी-२० सामन्यांची मालिका पार पडली. या मालिकेत भारतीय खेळाडूंचा बोलबाला पाहायला मिळाला. भारतीय संघाने ही मालिका ३-१ने आपल्या नावावर केली. आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या दृष्टीने भारतीय संघासाठी ही मालिका अतिशय महत्त्वाची होती. ही मालिका झाल्यानंतर आता न्यूझीलंडविरुद्ध टी-२० मालिकेला २१ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे.



टी-२० वर्ल्डकपआधी होणारी ही शेवटची टी-२० मालिका असणार आहे. या स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या भारतीय संघात दोन मोठे बदल करण्यात आले आहेत. उपकर्णधार शुबमन गिलला संघाबाहेर करण्यात आले आहे. मानेच्या दुखापतीमुळे मागील काही दिवसांपासून तो आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळू शकलेला नाही. त्याच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. त्याच्या जागी उपकर्णधारपदाची जबाबदारी अक्षर पटेलकडे जबाबदारी सोपवण्यात आली आहे. जितेश शर्मालादेखील संघाबाहेर करण्यात आले आहे. दुसरा यष्टीरक्षक फलंदाज म्हणून इशान किशनला संधी दिली गेली आहे, तर रिंकू सिंगचादेखील मुख्य संघात समावेश करण्यात आला आहे.

### टी-२०चे वेळापत्रक

**पहिला सामना** : २१ जानेवारी, विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियम, नागपूर

**दुसरा सामना** : २३ जानेवारी, शहीद वीर नारायण सिंग स्टेडियम,रायपूर

**तिसरा सामना** : २५ जानेवारी, बारसापारा क्रिकेट स्टेडियम, गुवाहाटी

**चौथा सामना** : २८ जानेवारी, डॉ. वाय.एस.आर. रेड्डी स्टेडियम, विशाखापट्टणम

**पाचवा सामना** : ३१ जानेवारी, ग्रीनफील्ड इंटरनॅशनल स्टेडियम, तिरुवनंतपुरम

**(सर्व सामने संध्याकाळी ७ वाजता सुरू होतील**)

### ▶ वनडे सामनेही रंगणार

भारतीय क्रिकेट संघ न्यूझीलंडविरुद्ध टी-२० मालिका खेळण्याआधी तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका होईल. दक्षिण आफ्रिकेतील विजयाचा आत्मविश्वास घेऊन भारतीय संघ न्यूझीलंडविरुद्ध मैदानात उतरेल. या मालिकेचे खास आकर्षण म्हणजे स्टार फलंदाज रोहित शर्मा आणि विराट कोहली हे पुन्हा मैदानात दिसणार आहेत. मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये हे दोन्ही दिग्गज पुन्हा खेळताना दिसणार असल्याने संघाला अनुभवाची मोठी ताकद मिळणार आहे तसेच युवा खेळाडूंना अनुभवी खेळाडूंसोबत खेळण्याची संधीही मिळेल.

### वनडे मालिकेचे वेळापत्रक

■ पहिला सामना : ११ जानेवारी, वडोदरा

■ दुसरा सामना : १४ जानेवारी, राजकोट

■ तिसरा सामना : १८ जानेवारी, इंदूर

**(तिन्ही सामने दुपारी १:३० वाजता सुरू होतील)**

एमसीए निमंत्रित क्रिकेट स्पर्धा

# सातारा संघाचा हिंगोलीवर विजय



**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित १९ वर्षाखालील मुलांच्या आंतरजिल्हा निमंत्रित स्पर्धेत सातारा जिल्हा क्रिकेट असोसिएशनने हिंगोली जिल्हा क्रिकेट असोसिएशन संघावर १९६ धावांनी दणदणीत विजय मिळवला. हा सामना पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट मैदानावर खेळला गेला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना सातारा संघाने पहिल्या डावात सर्व गडी बाद ३०९ धावा फलकावर नोंदवल्या होत्या. त्यामध्ये शादाब मुजावरने सर्वाधिक ७५, ईशान जोशीने ५३, तर सृजन बिचुकले याने ५१ धावांचे योगदान दिले. हिंगोली संघाकडून ओंकार मोगलने चार गडी बाद केले. हिंगोलीने पहिल्या डावात सर्व गडी गमावत ११८ धावा केल्या. सातारच्या संघाकडून ईशान जोशी व श्रावण खाडे यांनी प्रत्येकी चार फलंदाज बाद केले.

सातारा संघाने चार गडी बाद १४५ धावसंख्येवर डाव घोषित केला. त्यामध्ये आदिनाथ पाटील याने ५२, तर सृजन बिचुकलेने ४२ धावांची खेळी केली. हिंगोलीकडून सम्यक बागुलने ती बळी मिळविले. हिंगोलीच्या संघाला जिंकण्यासाठी चौथ्या डावात ३३६ धावांचे लक्ष्य होते, मात्र साताऱ्याच्या भेदक गोलंदाजीपुढे हिंगोलीचा डाव अवघ्या १४० धावसंख्येवर गडगडला. सातारा संघाकडून शादाब मुजावर याने सर्वाधिक पाच, तर अनिमेश घोरपडेने तीन फलंदाजांना माघारी धाडले.

अशा प्रकारे सातारा संघाने १९६ धावांनी दणदणीत विजय मिळवला. या संघाचे प्रशिक्षक हेमंत गुजर यांनी विजयाचे सर्व श्रेय खेळाडूंनी मैदानावर घेतले मेहनतीला दिले आहे.

# पनवेलमध्ये आज एक धाव मतदानासाठी!

## रोटरी मॅरेथॉन अंतर्गत महिला लगावणार दौड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने रोटरी मॅरेथॉन २०२५ अंतर्गत मतदान जागरूकतेसाठी एक धाव मतदानासाठी या संकल्पनेवर आधारित महिलांची स्पर्धा रविवारी (दि. २१) पनवेल वडाळे तलाव येथे आयोजित करण्यात आली आहे.

लोकशाही बळकट करण्यासाठी महिलांचा सक्रिय सहभाग वाढावा, मतदानाबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ६ वाजता मॅरेथॉनला वडाळे तलाव परिसरातून सुरुवात होणार असून ३ आणि पाच किमी अशा दोन गटांमध्ये ही दौड होणार आहे. शहरातील तसेच परिसरातील महिलांसाठी ही मॅरेथॉन खुली असून विविध वयोगटातील महिलांचा उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित आहे.

मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व महिलांना आकर्षक टी-शर्ट, बिब, रिफ्रेशमेंट, सहभाग प्रमाणपत्र, मेडल आणि व्हीएलसीसी कुपन्स देण्यात येणार आहेत. त्यामुळे आरोग्य, फिटनेस आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर संगम या मॅरेथॉनमध्ये पहायला मिळणार आहे.

# मास्टर्स गेममध्ये उत्तम मानेंना दोन सुवर्णांसह तीन पदके




**नवी मुंबई : बातमीदार**

मास्टर्स गेम्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आयोजित सहावी राज्यस्तरीय अ‍ॅथलेटिक्स स्पर्धा संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल भोसरी, पिंपरी चिंचवड, पुणे येथे नुकतीच झाली. या स्पर्धेत नवी मुंबईतील उत्तम माने यांनी दोन सुवर्णांसह एकूण तीन पदके जिंकली.

महाराष्ट्रातील सुमारे ६५० खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते. नवी मुंबईच्या सानपाडा विभागातील ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य उत्तम माने यांनीही स्पर्धेत सहभाग घेत हातोडाफेक आणि थाळीफेकमध्ये सुवर्ण, तर लांबउडीत रौप्यपदक जिंकले.

माने यांची नाशिक येथे २८ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या पहिल्या युनायटेड मास्टर्स स्पर्धेत निवड झाली आहे. अ‍ॅथलेटिक्सशिवाय १० मीटर एअर पिस्तूल व १० मी एअर रायफल शुटिंग स्पर्धेत तसेच डार्ट स्पर्धेत निवड झालेली आहे. त्यांनी विविध स्पर्धा व खेळांमध्ये आतापर्यंत ५८ सुवर्ण, ५६ रौप्य आणि ३२ कांस्यपदके जिंकलेली आहेत. नवी मुंबई परिसरात त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

आगरी सेवा संघाची कबड्डी स्पर्धा

# माऊली स्पोर्ट्स, सूर्यकांत मंडळ, भवानी माता, बारादेवी मंडळ दुसऱ्या फेरीत दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

माऊली स्पोर्ट्स्, सूर्यकांत मंडळ, भवानी माता, बारादेवी मंडळ यांनी आगरी सेवा संघाच्या कबड्डी स्पर्धेची दुसरी फेरी गाठली. प्रभादेवी येथील राजाराम साळवी उद्यानातील स्व.दि.बा. पाटील क्रीडानगरीत ही स्पर्धा खेळली जात आहे.





स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी माऊली स्पोर्ट्स क्लबने गणेशकृपा मंडळाचा ५२-२५ असा सरळ पराभव केला. आक्रमक सुरुवात करीत दोन लोण देत मध्यंतराला २८-०६ अशी आघाडी घेणाऱ्या माऊलीने नंतरदेखील आपल्या खेळातील आक्रमता कायम ठेवत आणखी दोन लोण देत गुणांचे अर्धशतक गाठले. सागर काष्टेच्या तुफानी खेळाला या विजयाचे श्रेय जाते. मध्यंतरानंतर गणेशकृपाच्या तेजश पाटीलला सूर सापडला, पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती.

दुसऱ्या सामन्यात सूर्यकांत मंडळाने अरुण मंडळाचा प्रतिकार ४२-२२ असा संपविला. विश्रांतीला २७-१३ अशी सूर्यकांत संघाकडे आघाडी होती. सूर्यकांच्या विजयाचे श्रेय निखिल मलिक यांच्या पूर्वार्धातील खेळाला जाते. उत्तरार्धात अरुण मंडळाच्या मयूर बोमकाटे यांनी टॉप गिअर टाकत सामन्याची रंगत वाढविली, पण संघाला विजयी करण्यात तो कमी पडला.

भवानी माता संघाने पहिल्या डावातील ०६-१४ अशा पिछाडीवरून आंबेवाडीचा २८-२० असा पाडाव केला. सुरुवातीला साहिल शेलारच्या चतुरस्त्र खेळाने पहिला लोण देत आघाडी घेतली होती, पण विश्रांतीनंतर भवानी माताच्या सुशांत धावडे याने तुफानी खेळ करीत दोन लोण देत बाजी पलटविली व संघाला दुसरी फेरी गाठवून दिली. शेवटच्या सामन्यात बारादेवीने जय खापरेश्वर संघाला ३०-२६ असे नमविले. पवन साटम बारादेवीकडून, तर अजिंक्य ढमाले, जय खापरेश्वरकडून उत्तम खेळले.

सहवास जरी सुटला, स्मृती सुगंध देत राहील..
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर, आठवण तुमची येत राहील..!



कै. सौ. सरिता जीवन टाकळे
यांचे सोमवार दि. १५/१२/२०२५ रोजी दुःखद निधन झाले आहे.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.
दशक्रिया विधी : बुधवार दि. २४/१२/२०२५ रोजी राहत्या घरी गावातील स्मशानभूमी वर होणार आहे.
उत्तर कार्य : शुक्रवार दि. २६/१२/२०२५ रोजी राहत्या घरी श्री कमळाकर टाकळे यांच्या निवासस्थानी होईल.
शोकाकुल - समस्त टाकळे परिवार

# अ‍ॅडव्होकेट प्रीमियर लीगसाठी अलिबागचा संघ नाशिकला रवाना

**अलिबाग : प्रतिनिधी**

नाशिक येथे होणाऱ्या महाराष्ट्र आणि गोवा वकील संघटनेच्या वार्षिक टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी अलिबाग सी-हॉक्स वकिलांचा क्रिकेट संघ रवाना झाला आहे. स्पर्धेत महाराष्ट्र, गोव्यासह राज्यातून १०० संघ सहभागी झाले आहेत.



महाराष्ट्र अ‍ॅण्ड गोवा बार असोसिएशनच्या वतीने दरवर्षी स्टेट लेव्हल अ‍ॅडव्होकेट प्रीमियर लीगचे आयोजन करण्यात येते. या वर्षी ही स्पर्धा नाशिक जिल्हा व अमरावती जिल्हा वकील संघटनेच्या वतीने तसेच अ‍ॅड.विवेकानंद रामकृष्ण जगदाळे स्पोर्ट्स फाऊंडेशन व नाशिक जिल्हा क्रिकेट अ‍ॅण्ड स्पोर्ट्स असोसिएशन, नाशिक बार असोसिएशन, अमरावती बार असोसिएशन यांच्या सहकार्याने २० ते ३१ डिसेंबरपर्यंत होणार आहे.

स्पर्धा प्रथम साखळी व नंतर बाद फेरीनुसार खेळवली जाणार असून या स्पर्धेत अ‍ॅड. समीर बंगाली यांच्या नेतृत्वाखाली सहभागी झालेल्या अलिबाग सी-हॉक्स अ‍ॅडव्होकेट संघाला अलिबाग व रायगड वकील संघटनेचे पदाधिकारी व सदस्य यांच्यासह क्रिकेटप्रेमींनी शुभेच्छा दिल्या.

28TH YEAR
महोत्सव रोटरीचा... जल्लोष पनवेलकरांचा..
Rotary
यावर्षी कर्नाळा स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमी मैदान
प्लॉट नं. ७, कालसेकर कॉलेज समोर, पनवेल येथे
दिनांक २२ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ सायं. ४ ते रात्री १० वा.
रोटरी क्लब ऑफ पनवेल व रोटरी फाऊंडेशन पनवेल आयोजित




१० रंगतदार दिवसांचा आनंद, मजा आणि उत्साह ❖ २+ लाख लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद
संधी असंख्य आकर्षक ग्राहकोपयोगी वस्तु खरेदीची ❖ चवदार खाद्यपदार्थांची मेजवानी
आकर्षक करमणूकीच्या कार्यक्रमांची रेलचेल
स्टॉल बुकिंग साठी संपर्क : 91374 72736
२८ वे वर्ष एका अभिनव उपक्रमाचे... मनोरंजनाद्वारे समाजसेवेसाठी निधी संकलनाचे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com